# भगिनीला न्याय देण्यासाठी सर्व समाज एकवटला

सायं.दैनिक
बीड
प्रारंभ
संपादक - जालिंदर ज्ञानदेव धांडे



# मुंडे तुझ्यापेक्षा अंडी देणारी कोंबडी बरी

## मुंडे कुटुंबीयांना शंभर टक्के न्याय मिळवून देणार

प्रारंभ । वृत्तसेवा

बीड : २१ महिने होत आले तरी परळीतील महादेव मुंडे हत्या प्रकरणातील आरोपी अजूनही मोकाटच आहेत. २१ महिन्यापासून न्यायासाठी लढा देणाऱ्या ज्ञानेश्वरीताईला अजूनही न्याय मिळालाच नाही. यानंतर ज्ञानेश्वरी मुंडे यांनी मनोज जरांगे पाटील यांना आम्हाला न्याय द्या अशी हाक दिली होती, यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी परळीला भेट देत या प्रकरणामध्ये जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कठोरात कठोर कारवाई होण्यासाठी आम्ही तुमच्यासोबत आहोत असा शब्द दिला होता, यानंतर आज बीडमध्ये ज्ञानेश्वरीताईंना न्याय देताना सर्व समाजाची बैठक बोलावण्यात आली होती. या बैठकीला सर्व समाजातील लोक मोठ्या संख्येने उपस्थित होत होते. यावेळी बोलताना मनोज जरांगे पाटील म्हणाले की, मुंडे कुटुंबाला आम्ही शंभर टक्के न्याय मिळवून देणार आहोत, आमच्या भगिनींने ज्या काही मागण्या केल्या होत्या त्यातील एसआयटी जे काही अधिकारी अपेक्षीत होते त्या अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या ह्या झालेल्या आहेत, तसेच ज्ञानेश्वरी मुंडे व मुख्यमंत्र्यांची भेट होवू नये यासाठी धनंजय मुंडेंनी दिवसात तीन-चार वेळा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. धनंजय मुंडेंच्या या वृत्तीमुळे मनोज जरांगे पाटील यांनी आक्रमक होत तुझ्या पेक्षा अंडे देणारी कोंबडी बरी अशा शब्दात धनंजय मुंडेंवर निशाणा साधला. तसेच धनंजय मुंडेंना मंत्रीपद हे माणसं संपवण्यासाठीच हवे असल्याचं मतही यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी त्यांच्या शब्दातून अजित पवार यांना एक आवाहन केले की, जर तुम्ही मुंडेंना मंत्रिपद दिलं तर येणाऱ्या काळात तुमच्या सर्व उमेदवारांना पाडू. आजच्या या बैठकीला खासदार बजरंग सोनवणे, आ.प्रकाश सोळंके, आ.संदीप क्षीरसागर, धनंजय देशमुख, महादेव मुंडेंचे संपूर्ण कुटुंबीय यावेळी उपस्थित होते.



### जिथे अन्याय तिथे मनोजदादा-खा.सोनवणे

बीड शहरात आयोजित करण्यात आलेल्या बैठकीला खा.बजरंग सोनवणे यांनी उपस्थित राहात ज्ञानेश्वरीताईला न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध असल्याचे मत व्यक्त केले. तसेच आमची भगिणी २१ महिन्यांपासून न्याय मागते तरी अजूनही न्याय मिळाला नाही. सर्वात भयानक संघटना, टोळ्या परळीत असल्याचे मतसुद्धा यावेळी खा.बजरंग सोनवणे यांनी व्यक्त केले. पंकज कुमावतसारखे अधिकारी या केसमध्ये आले तर दुध का दुध व पाणी का पाणी होईल. तसेच येथील भ्रष्ट अधिकारी जोपर्यंत बदललेजात नाहीत तो पर्यंत जिल्ह्यात कोणतेच बदल होणार नाहीत यामुळे पहिले येथील अधिकारी बदलण्याची गरज आहे.

### एसआयटी स्थापन झाल्यामुळे सर्व आरोपी गजाआड होतील-आ.सोळंके

बीड शहरात पार पडलेल्या व्यापक बैठकीला माजलगाव मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मनोज जरांगे यांनी आ.सोळंके यांचे विशेष कौतूक केले. यावेळी बोलताना आ.सोळंके म्हणाले की, मनोजदादा या लढ्यामध्ये जो काही निर्णय घेतील त्या निर्णयासोबत आम्ही आहोत, तसेच एसआयटी स्थापन झाल्यामुळे लवकरच यातील सर्व आरोपी गजाआड होतील असे मतही यावेळी प्रकाश सोळंके यांनी व्यक्त केले.

### वाल्मिक कराड धनंजय मुंडेंचे ऐकल्याशिवाय काहीच करत नव्हता सर्व धागेदोरे मुंडेंजवळच, धनंजय मुंडेंची सखोल चौकशी करा

### दादा तुम्ही या प्रकरणात लक्ष दिल्यामुळे आता खऱ्या अर्थाने न्याय मिळेल-आ.क्षीरसागर

संतोष देशमुख प्रकरणामध्ये सर्वात पहिले वाल्मिक कराडचा कसा संबंध आहे यासंदर्भात आ.संदीप क्षीरसागर यांनी आवाज उठवला होता. यानंतर खऱ्या अर्थाने या प्रकरणावर जोरदार चर्चा सुरू झाल्या. ज्ञानेश्वरी मुंडेताईला न्याय देण्यासाठी आता आ.संदीप क्षीरसागर सुद्धा पुढे आले आहेत. आजच्या बैठकीमध्ये मनोज जरांगे पाटील आल्यामुळे आता मुंडे कुटुंबीयाला न्याय मिळेल असा विश्वास सुद्धा आ.संदीप क्षीरसागर यांनी यावेळी व्यक्त केला. तसेच परळी पॅटर्न, खोटे गुन्हे यासंदर्भात सुद्धा संदीप क्षीरसागर यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

## टिपरे महोत्सवात ओम ग्रुप प्रथम पारितोषिकाचा मानकरी



### आ. विजयसिंह पंडित यांच्या उपस्थितीत पारितोषिक वितरण समारंभ संपन्न

गेवराई । प्रतिनिधी

शारदा प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित टिपरे महोत्सवात टिपरे स्पर्धा सांघिक मध्ये ओम ग्रुप प्रथम पारितोषिकाचा मानकरी ठरला. संघर्ष क्रीडा मंडळ द्वितीय पारितोषिकाचे मानकरी ठरले तर तृतीय पारितोषिक जगदंबा ग्रुपला आणि उत्तेजनार्थ अनुक्रमे सावतानगर ग्रुप आणि झुंजार ग्रुपला प्रदान करण्यात आले. टिपरे महोत्सवाचे आयोजक आ. विजयसिंह पंडित आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत उपस्थितीमध्ये स्पर्धेतील विजेत्यांना रोख रक्कम व स्मृती चिन्हाचे वाटप करण्यात आले.

आ. विजयसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवार दिनांक ३० जुलै

## उपेक्षितांच्या व्यथा व दुःखाला साहित्यातून मांडणारा आवाज म्हणजेच आण्णाभाऊ साठे:पप्पू कागदे

बीड । प्रतिनिधी

साहित्य सम्राट लोकशाहीर साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त रिपाइंच्या वतीने युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा अनु-जाती जमाती संघर्ष समितीचे अध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यापासून अभिवादन रॅली व क्रांती मशाल रॅली काढून लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांना अभिवादन करण्यात आले. वास्तववादी साहित्य निर्माण करणारे साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे यांनी आपल्या हयातीत १५ कथासंग्रह, ३५ कादंबऱ्या, पटकथा, नाटके, पोवाडे यांच्या माध्यमातून साहित्याचा डोंगर उभा केला. साहित्यरत्न लोकशाहीर



आण्णाभाऊ साठे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे वारसदार होते. फकीरा ही कादंबरी त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना समर्पित करून म्हणाले की जग बदल घालून घाव मज सांगून गेले भीमराव या महीप्रमाणे ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना गुरुस्थानी मानीत होते. फकीरा कादंबरीला १९६१ साली राज्य सरकारकडून उत्कृष्ट कादंबरीचा पुरस्कार मिळाला होता. आण्णाभाऊ साठे यांनी आपल्या लिखाणात संयुक्त महाराष्ट्र चळवळ मुंबई महाराष्ट्राला मिळाली पण बेळगाव हे कर्नाटकमध्ये विलीन करण्यात आले. तेव्हा अण्णाभाऊंनी कवन रचून महाराष्ट्र प्रेम व्यक्त केले. माझी मैना गावावर राहिली माझ्या जीवाची होतीया काहिली साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे यांनी उपेक्षितांच्या व्यथा व दुःखाला जगासमोर मांडून त्यांना आपल्या साहित्यातून न्याय मिळवून देण्यासाठी निर्माण केलेले साहित्य आजच्या युवक पिढीने आत्मसात करून इतरांना वाचण्यासाठी प्रवृत्त केले तरच आण्णाभाऊ साठे यांना खरे अभिवादन ठरेल.

असे प्रतिपादन युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंती प्रसंगी केले. यावेळी मा. आ.राजेंद्र जगतात,

## वाळू वाहतूक करणाऱ्या टिप्पर टेम्पोचा अपघात

आष्टी । प्रतिनिधी

टायर फुटल्याने अवैध वाळू वाहतूक करणारा भरधाव टिप्पर (-ललळवशर्पी)विरुद्ध दिशेने जाऊन एका टेम्पोवर जाऊन धडकल्याची घटना आज, शुक्रवार (दि.१) रोजी सकाळी साडेसहाच्या दरम्यान बीड-अहिल्यानगर राज्य महामार्गावरील सांगवी शिवारात घडली. सुदैवाने या अपघात कोणतीही जीवितहानी झाली नाही.



अहिल्यानगर येथून पीव्हीसी पाईप घेऊन एक टेम्पो ( क्रमांक एम.एच १६,ए.वाय.३२२३) सकाळी बीडकडे रवाना झाला. तर याचवेळी डोईठाण वरून धामणगावकडे अवैध वाळू वाहतूक करणारे टिप्पर भरधाव वेगात जात होता. सकाळी साडेसहाच्या दरम्यान (इशशव)बीड-अहिल्यानगर राज्य महामार्गावरील आष्टी तालुक्यातील सांगवी परिसरात टायर फुटल्याने टेम्पो अनियंत्रित होऊन विरुद्ध दिशेला जाऊन टेम्पोवर धडकला. या अपघातात दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. सुदैवाने चालक किरकोळ जखमी झाले आहेत. माहिती मिळताच घटनास्थळी कडा पोलिस चौकीचे पोलिस हवालदार भाऊसाहेब आहेर, अमोल नवले, वाहन चालक प्रताप घोडके यांनी भेट दिली असून पंचनामा केला आहे.

## प्राण्यांसाठीच्या सुपर स्पेशालिटी रुग्णवाहिकेचे पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते लोकार्पण

### प्राणीमित्रांची सेवा हेच मुख्य ध्येय ठेवून भविष्यातही हा उपक्रम अधिक व्यापक व्हावा

मुंबई । प्रतिनिधी

**'समस्त महाजन' या संस्थेच्या 'अर्हम अनुकंपा प्रोजेक्ट' अंतर्गत मुंबई आणि मुंबई उपनगर परिसरातील गोमाता आणि इतर प्राण्यांच्या सेवेसाठी असलेल्या सुपर स्पेशालिटी प्राणी रुग्णवाहिकेचे लोकार्पण आज पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले.**

या उद्घाटनप्रसंगी संस्थेचे व्यवस्थापकीय विश्वस्त गिरीश शहा, विश्वस्त परेश शहा, तसेच समस्त जैन समाजातील अनेक बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'समस्त महाजन' या संस्थेच्या अर्हम अनुकंपा प्रोजेक्टअंतर्गत सुरू करण्यात आलेली ही प्रगत तंत्रज्ञानाने सुसज्ज रुग्णवाहिका मुंबई, ठाणे, आणि पालघर या भागांतील गोमाता व इतर जखमी प्राण्यांवर उपचार करणार आहे. समाजातील विविध गोशाळांमधील जखमी, आजारी गायी व इतर प्राण्यांना दवाखान्यात नेण्यासाठी हायड्रोलिक रुणावाहिका महत्त्वाचे ठरणार आहे.



प्राणीमात्रांचे दुःख दूर करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा आहे. प्राणीमित्रांची सेवा हेच मुख्य ध्येय ठेवून भविष्यातही हा उपक्रम अधिक व्यापक व्हावा, अशी अपेक्षा पशु संवर्धन मंत्री श्रीमती मुंडे यांनी व्यक्त केली. समस्त महाजन ही संस्था गेल्या अनेक वर्षांपासून प्राणी कल्याण, पर्यावरण संवर्धन आणि समाजसेवा क्षेत्रात कार्यरत आहे. संस्थेकडून मोफत प्राणी उपचार, आहार वाटप, वृक्षारोपण, तसेच नैसर्गिक आपत्तीग्रस्तांना मदत अशी विविध कार्ये नियमितपणे केली जात आहेत. संस्थेच्या वतीने आतापर्यंत गोमाता व इतर अशा ९२,५०० जखमी प्राण्यांवर मागील ३६ महिन्यांत उपचार करण्यात आले आहे.

## उद्या श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे इंदोरीकर महाराजांचे कीर्तन

बीड । प्रतिनिधी

विसाव्या शतकातील महान सद्गुरू संत किसन बाबा महाराज यांच्या २७ व्या पुण्यस्मरणार्थी गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे उद्या दि.०२ ऑगस्ट शनिवार रोजी अखंड हरिनाम सप्ताह आरंभ होणार आहे. या अखंड हरिनाम सप्ताह मध्य पाहिले कीर्तनरूपी पुष्प शनिवारी रात्री ०८ ते ११ वाजता समाज प्रबोधकार निवृत्ती महाराज इंदोरीकर यांचे कीर्तन श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी रात्री येथे होणार आहे.



उद्या दि ०२ ऑगस्ट शनिवार रोजी सकाळी दीप प्रज्वलन, कलश स्थापन, कलश पूजन, गुरूची प्रतिमा पूजन श्री ह.भ.प. शांतीब्रम्ह गुरुवर्य श्री नवनाथ बाबा महाराज श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी यांच्या हस्ते होणार आहे. नंतर गाथा पूजन, ग्रंथ ज्ञानेश्वरी पूजन, टाळ मृदुंग वीण पूजन होईल व्यासपीठ पूजन झाल्यानंतर फुल टाकण्याचा कार्यक्रम होणार आहे. ह.भ.प. माधव महाराज डाके ज्ञानेश्वरीचे गाढे अभ्यासक यांचे प्रवचन होणार आहे. प्रवचन झाल्यावर कीर्तन व संगीत भजन नंतर हरी जागर होणार आहे.श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी परिसरातील भाविक भक्तांनी उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात येत आहे.

## परळीसाठी तीन नायब तहसीलदार नियुक्त

### माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांच्या पाठपुराव्याला यश

परळी । प्रतिनिधी

**परळी तालुक्याला तीन नवे नायब तहसीलदार मिळाले असून, महसूल व निवडणूक विभागाच्या कामकाजात आता गती येणार आहे. माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले असून, राज्य शासनाने अधिकृत आदेश जारी केले आहेत.**




या आदेशानुसार परळी तहसील कार्यालयात महसूल विभागासाठी नायब तहसीलदार पंडित सुरवसे, निवडणूक विभागासाठी अशोक भोजने यांची तर परळी उपविभागीय अधिकारी कार्यालयात महेश वाकडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. बऱ्याच काळापासून परळी तहसील कार्यालयातील नायब तहसीलदार पदे रिक्त होती. परिणामी, नागरिकांच्या महसूल व निवडणूक संबंधित कामांमध्ये अडथळे निर्माण होत होते. ही रिक्त पदे भरल्यामुळे आता कामकाज अधिक कार्यक्षमतेने पार पाडले जाणार आहे. या नियुक्त्यांमुळे तालुक्यातील प्रशासकीय कामांना चालना मिळणार असून, या निर्णयाबद्दल माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभार मानले आहेत.

# न फनकार तुझसा, तेरे बाद आया, मोहम्मद रफी तू बहोत याद आया

आज ३१ जुलै, चार दशकांहून अधिक काळ आपल्या सुमधुर आवाजाने रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे महान गायक, सूरसम्राट मोहम्मद रफी यांचा स्मृती दिन. मोहम्मद रफी यांचा जन्म २४ डिसेंबर १९२४ ला पंजाब राज्यातील कोटला सुल्तानसिंह या गावात झाला. मोहम्मद रफी यांना लहानपणापासूनच गायनाची आवड होती. मोहम्मद रफी १४ वर्षाचे असताना त्यांचे कुटुंब लाहोरला स्थलांतरित झाले. तिथेच त्यांनी शास्त्रीय संगीतातील दिग्गज गायक उस्ताद बडे गुलाम अली, उस्ताद अब्दुल खान, पंडित जीवनलाल मट्टू आणि फिरोज निजामी या महान शास्त्रीय गायकांकडे संगीताचे धडे गिरवले. पंजाबी चित्रपट गुल बलोच पासून त्यांनी चित्रपट गायनाला सुरवात केली. या चित्रपटातील त्यांच्या आवाजातील गाणी लोकप्रिय झाली. त्यांच्या आवाजाने प्रभावित होऊन फिरोज निजामी यांनी त्यांना लाहोर रेडिओला नोकरीला लावले. ते रेडिओवर गाणी म्हणू लागली. रेडिओवरील त्यांची गाणी ऐकून जे. बी. वाडिया यांनी त्यांना आपल्या बाजार या चित्रपटासाठी पार्श्वगायन करण्याची विनंती केली ती मोहम्मद रफी यांनी मान्य केली. या चित्रपटातील सातही गाणी मोहम्मद रफी यांनीच गायली. ती सर्व गाणी लोकप्रिय झाली. त्याकाळातील लोकप्रिय संगीतकार नौशाद यांनी त्यांना अनेक चित्रपटात संधी दिल्या. पुढे या जोडीने हिंदी चित्रपट सृष्टीवर अधिराज्य गाजवले. संगीतकार नौशाद आणि गायक मोहम्मद रफी म्हणजे चित्रपट सुपरहिट असे समीकरणच बनले. मोहमद रफी यांच्या आवाजाने नौशाद यांच्यावर अक्षरशः मोहिनी घातली होती. ५० च्या दशकात नौशाद रफी साहेबांव्यतिरिक्त कोणत्याही गायकासोबत काम करत नव्हते. या दोघांनी लोकप्रिय संगीताचा वापर करून चित्रपट सृष्टीतील गीतांचे आयामच बदलून टाकले. बैजू बावरा, उडण खटोला, कोहिनूर, मेरे मेहबूब, दिल लिया दर्द दिया, संघर्ष या लोकप्रिय झालेल्या चित्रपटांचे संगीतकार नौशाद आणि गायक मोहम्मद रफी ही जोडी प्रसिद्ध होती. ओ.पी. नय्यर, सचिन देव बर्मन, शंकर जयकिशन, मदन मोहन, रोशन या संगीतकरांचेही मोहम्मद रफी हे आवडते गायक होते. या संगीतकरांनी दिलेले संगीत आणि मोहम्मद रफी यांनी गायलेली सर्व गाणी लोकप्रिय झाली. १९५० ते १९८० असा सुमारे ४ दशकांचा काळ मोहम्मद रफी यांनी अक्षरशः गाजवला. गुरुदत्त, दिलीपकुमार, राजकपूर, देवानंद, शम्मी कपूर, शशी कपूर, राजेंद्र कुमार, सुनील दत्त, राजकुमार, राजेश खन्ना, अमिताभ बच्चन, धर्मेंद्र, जितेंद्र, विनोद खन्ना, ऋषी कपूर अशा सर्व नायकांना त्यांनी आवाज दिला. या सर्व नायकांना महानायक करण्याचे काम मोहम्मद रफी यांच्या आवाजाने केले. मोहम्मद रफी यांच्या आवाजाने तरुणाईला वेड लावले होते. त्यांची सर्व गाणी इतकी लोकप्रिय झाली की ती आजही गायली जातात, ऐकली जातात. मोहम्मद रफी यांनी सर्व प्रकारची गाणी गायली. केवळ हिंदीतच नाही तर उर्दू, पंजाबी, मराठी, तेलगू या भाषांमध्येही त्यांनी गाणी गायली. त्यांची गाणी केवळ भारतातच नव्हे तर जगभर लोकप्रिय झाली. मोहम्मद रफी यांना गायनासाठी सहा वेळा फिल्मफेअरचा पुरस्कार मिळाला. भारत सरकारनेही पद्मश्री हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. भारत सरकारने त्यांच्या स्मरणार्थ त्यांच्या नावाचा स्टॅम्पही तयार केला आहे. ३१ जुलै १९८० ला रात्री १० वाजून ५० मिनिटांनी मोहम्मद रफी यांनी जगाचा निरोप घेतला. मोहम्मद रफी यांच्या अंत्ययात्रेत दहा हजारांहून अधिक चाहते उपस्थित होते. २०१३ मध्ये भारतीय हिंदी सिनेमाला १०० वर्ष पूर्ण झाली त्यानिमित्ताने बिबीसी एशिया नेटवर्कने एक सर्व्हे केला. त्यात मोहम्मद रफी हेच हिंदी चित्रपट सृष्टीतील महान गायक म्हणून नावाजले गेले. मोहम्मद रफी हे केवळ गायक म्हणूनच नाही तर व्यक्ती म्हणूनही महान होते. मोहम्मद रफी नेहमीच दुसऱ्यांना मदत करण्यात पुढे असत. त्यांनी काही संगीतकारांसाठी फुकट गाणीही गायली आहेत. रॉयल्टी साठी त्यांनी कधी कोणाला अडवले नाही. त्यांच्या विषयी लता मंगेशकर म्हणतात, मधुर स्वभावाचा सुरीला माणूस. माझे भाग्य आहे की माझी बहुतेक गाणी मी त्यांच्यासोबत गायली आहेत. संगीत न समजणाऱ्या लोकानांही त्यांनी कानसेन बनवले. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या सन्मानार्थ आनंद बक्षी यांनी लिहिले होते की, न फनकार तुझसा, तेरे बाद आया, मोहम्मद रफी तू बहोत याद आया.....

श्याम ठाणेदार दौंड जिल्हा पुणे ९९२२५४६२९५

# ! अण्णा भाऊ साठे : शब्दांमधून पेटलेली क्रांती !




या मातीत दोन तुकाराम जन्माला आले. एका तुकारामाने टाळ घेतला, तर दुसऱ्याने डफ. एकाने अभंग लिहिले, दुसऱ्याने कथा, कादंबऱ्या, लावण्या. कवी नितीन चंदनशिवे यांच्या या ओळी संत तुकाराम आणि साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे यांच्या क्रांतिकारक कर्तृत्वाचा समांतर पट मांडतात. अण्णा भाऊ साठे-एक सामान्य मजुर, पण असामान्य प्रतिभेचे लोकशाहीर. मराठी साहित्यात आणि सामाजिक परिवर्तनाच्या लढ्यात त्यांचे योगदान अमूल्य आहे.

एका झाडाखाली तीन दगडांची चूल करून मडक्यात अन्न शिजवून दोन मुलं आणि बायको यांना जगवणारा हा दलित वरवर कंगाल दिसला तरी त्याची संसार करण्याची इच्छा केव्हाही पवित्रच असते.अण्णा भाऊंच्या या ओळीतून समाजातील दलित, वंचित वर्गाचं व्यथित आणि विस्थापित जीवन प्रकट होतं. शिक्षण, पैसा, प्रतिष्ठेचा आधार नसताना फक्त अनुभव, निरीक्षण आणि अंतःप्रेरणेच्या जोरावर त्यांनी मराठी साहित्यात एक वेगळी वाट निर्माण केली. वारणेच्या खोऱ्यातील वाटेगावसारख्या खेड्यातून पायी चालत मुंबईपर्यंतचा त्यांचा प्रवास म्हणजेच एका लढवय्या लेखकाचा संघर्षाचा इतिहास आहे. त्यांनी शिकवलेलं जग पुस्तकांमधून नव्हे, तर वास्तवातून शिकलेलं होतं. त्यामुळेच त्यांच्या कथांमध्ये फोल सल्ले नव्हते, तर सत्य परिस्थितीचा अनुभव होता.

'फकिरा' ही त्यांची कादंबरी केवळ एक साहित्यिक कृती नाही, तर ती म्हणजे लढ्याची, स्वाभिमानाची आणि नवजीवनाची घोषणा आहे.

अण्णा भाऊ हे केवळ साहित्यिक नव्हते, तर एक कार्यकर्ता होते. संयुक्त महाराष्ट्र चळवळ, कम्युनिस्ट पक्षाची प्रेरणा, कामगार वर्गासाठी गीत-गद्य-नाटक या सर्व माध्यमांतून ते सक्रिय राहिले. जनतेबरोबर असलेला लेखकच खरा लेखक. हे त्यांचे तत्वज्ञान आजही प्रत्येक संवेदनशील साहित्यिकासाठी मार्गदर्शक आहे. त्यांनी लोकनाट्य, पोवाडे, लावण्या, कथासंग्रह, कादंबऱ्या, प्रवासवर्णने या विविध साहित्यप्रकारातून दलितांच्या दुःखांची नोंद केली.

हे जग शेषाच्या मस्तकावर नसून दलिताच्या तळहातावर तरलेलं आहे, या ओळीतून त्यांच्या सामाजिक दृष्टिकोनाचा गाभा प्रकट होतो. ते म्हणायचे - त्याचं जीवन खडकातून झिरपणाऱ्या पाझरासारखं आहे. त्याला जवळून बघा. मग लिहा. शाहीर म्हणून अण्णा भाऊंनी 'लोक' या संज्ञेला स्वतःच्या लेखणीतून अर्थ दिला. त्यांच्या साहित्याची नायिका ही शोभेची बाहुली नाही. ती स्वाभिमानी, श्रमण करणारी, अन्यायाशी लढणारी आणि आपला हक्क घेणारी आहे.



आजही अण्णा भाऊंचं साहित्य वाचताना वाटतं की, त्यांनी आपल्या काळाचं नव्हे, तर भविष्यातल्या संघर्षांचंही भाकीत केलं होतं.

आज ०१ ऑगस्ट रोजी अण्णा भाऊंचा जन्मदिवस साजरा करताना त्यांच्या आठवणी केवळ औपचारिक नव्हेत. त्या असतात प्रेरणादायी.

अण्णाभाऊंचे साहित्य केवळ 'दलित साहित्य' म्हणून वाचण्याची चूक आपण करू नये. ते मानवी मूल्यांची, स्वातंत्र्याची आणि सामाजिक समतेची ग्वाही देणारे साहित्य. आहे.अण्णा भाऊ साठे हे एका समाजाचे नव्हते, ते साऱ्या जगातील कष्टकऱ्यांचे होते-आजही आहेत आणि पुढेही राहतील.साहित्य हा समाजाचा तिसरा डोळा आहे, हे सांगणारा हा लेखक स्वतः त्या डोळ्याची ज्योत बनून जळत राहिला.

आज आपल्याला तीच ज्वाळा पुढे नेण्याची गरज आहे !!

डॉ.महादेव अंगद जगताप
श्री बंकटस्वामी महाविद्यालय, बीड
ई-मेल : mahadevj9gmail.com
Mob : ९५०३२८१९२८

# साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांना समजून घेतांना

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा जन्म वाटेगाव जि. सांगली येथे १०ऑगस्ट १९२० रोजी भाऊ साठे यांच्या कुटुंबात झाला. त्यांचे नाव 'तुकाराम' असे ठेवण्यात आले होते. वाटेगाव हे औंध संस्थानात होते,तेव्हा दलितांच्या मुलांना वेगळी शाळा होती.शिक्षक सवर्ण असल्यामुळे ते दलित मुलांना दूरवर बसूनच त्यांच्या पाठीवर धडे देत असत. पहिल्या दिवशी गिरवण्यासाठी दिलेली काही मुळाक्षरे दुसर्या दिवशी अण्णांनी पाठीवर लिहिलेले नव्हते. म्हणून मास्तरांनी अण्णांना फार मोठी शिक्षा केली होती. त्या दिवसापासून अण्णांनी शाळेकडे पाठ फिरवली.अशा परिस्थितीत अण्णांच्या कुटुंबात माणसांची संख्या अधिक असल्यामुळे घरात उपासमारी ही नित्याचीच बाब होती.म्हणून 'वडिल भाऊ' साठे यांनी उदरनिर्वाहासाठी मुंबईला जाण्याचे ठरविले.वाटेगावमध्ये सवर्ण शिक्षकाने मारल्यामुळेच अण्णाभाऊंनी शाळा सोडली होती.अण्णाभाऊ साठे यांच्या एकूण २६ कथासंग्रहातून सुमारे १३० कथा प्रकाशित झाल्या आहेत. संपूर्ण कथा लेखनातून तत्कालीन परिस्थितीचे भयानक वास्तव रेखाटले आहे.व आर्थिक विषमतेसोबतच सामाजिक विषमतेचे चित्रणही अण्णाभाऊंच्या कथा मधून प्रकट होतांना दिसते. दीड दिवस शाळेत जाऊन अफाट असे साहित्य निर्माण केले. त्यात कथा,कादंबरी,नाटक. लोकनाट्य, लावण्या, प्रवासवर्णन, आणि शाहिरी फटका. इत्यादी लिखाणाचा थक्क करणारा प्रवास आहे.



भारतातील जातीव्यवस्था नष्ट करण्याच्या दृष्टीने कम्युनिस्ट विचारधारा अपुरी आहे, याची जाणीव अण्णाभाऊंना झालेली होती. त्यामुळे उत्तर आयुष्यात अण्णाभाऊ आंबेडकरमय अर्थात आंबेडकरवादी झाले होते.

आंबेडकरी चळवळीचा अभ्यास ते १९४२पासून करत होते. त्यानंतर सन १९५६ पासून ते आंबेडकरी चळवळीकडे वळले आहेत. तसे १९६६ पर्यंत ते कम्युनिस्ट चळवळीमध्ये होते. शेवटचे तीन वर्ष मात्र त्यांनी कम्युनिस्ट पक्षासोबतचे अथवा कलापथका सोबतचे सर्व संबंध तोडले.अण्णाभाऊ खर्या अर्थाने मानवतावादी होते. आयुष्यभर त्यांनी आपल्या तत्त्वाशी कधी तडजोड केली नाही. बौद्ध धर्मामुळे समाजात झालेला सकारात्मक बदल पाहून अण्णाभाऊ विवेकपूर्ण आणि सुक्ष्म निरीक्षणाद्वारे परिवर्तनवादी विचार मांडतात.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या क्रांतिकारी चळवळीमुळे समाजामध्ये जे प्रबोधन झाले, याचे वास्तव दर्शवणार्या काही कथा अण्णाभाऊंनी लिहिल्या आहेत.यामुळे भारतीय समाजव्यवस्थेतील एक भयाण वास्तव अधोरेखित झाले आहे. अतिशूद्र समजल्या गेलेल्या, अस्पृश्य जातीमधील 'अस्पृश्यता' या कथेतून उपकाराची फेड अण्णा भाऊंनी चित्रित केली आहे. पिढ्यानपिढ्या धर्माच्या नावावर अन्याय-अत्याचार होत आलेला आहे. भारतातील जातीव्यवस्था क्रमिक असमानतेवर उभी आहे. विशेषत: 'फकीरा' ही १९५९ ला लिहिलेली उत्कृष्ठ व सर्वश्रेष्ठ कादंबरी अण्णाभाऊंनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या झुंजार लेखणीला अर्पण केली आहे.त्यानंतर 'बुद्धाची शपथ' नावाची कथा लिहिली. ज्यामध्ये डॉ.बाबासाहेबांचा स्पष्टपणे उल्लेख आहे.'संयुक्त महाराष्ट्राचा लढा व जातवास्तव' हा लेख, 'युगांतर' मधून प्रसिद्ध झाला, त्यामध्येही डॉ. बाबासाहेबांचा स्पष्टपणे उल्लेख आहे.

लोकशाहीर ही पदवी सुध्दा अण्णाभाऊंना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनीच दिली असे म्हटले आहे.अण्णाभाऊ साठे आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची प्रत्यक्षात पहिली भेट ही १९५९ साली मुंबईत झाली. अण्णाभाऊ,१९४० पासून बाबासाहेबांना पाहत होते, ऐकत होते व अभ्यासत होते. अण्णाभाऊंच्या मनावर बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणाची घटना कधीही भरून न येणारी जखम करून गेली. असे ही त्यांनी लिहिले आहे.शेवटी जग बदल घालुनी घाव । सांगुनी गेले मला भीमराव या कवनाद्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मार्गच जग बदलू शकतो,असे ठामपणे सांगितले आहे.हे आपण पूर्णपणे लक्षात घेतले पाहिजे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्रिवार अभिवादन...!

-प्रा.डॉ.एस.एस.ढवळे
मोबा.नं.९६८९६८५९२१

पान १/४ वरून

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे

प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ निलेश मिसाळ साहेब,प्रसिद्ध कान नाक घसा तज्ञ डॉ राहुल दुबाले साहेब, माजी सरपंच हरी पवार, कर्जनीचे सरपंच अंकुश गायकवाड, श्रीमती गायकवाड, डॉ महादेव लहाने इत्यादी प्रमुख पाहुणे उपस्थित होते तर रक्तदाते म्हणून विशाल चांदमारे, नाना गोडसे, कार्तिक वाघमारे,निखिल सानप विष्णूबाळ झोडगे,अंगद बहिर, पवन ढाकणे, सचिन मरकुटे, आदित्य तांगडे, शुभक पालवनकर,मिनीनाथ मुंडे सोमनाथ मुंडे ,खेडकर, कुणाल, रोहित जाधव, इतर रक्तदात्यांनी सहकार्य करून कार्यक्रम यशस्वी केला तसेच महाराजा मित्र मंडळाचे लकी भैय्या कंडेरे, यांच्यासह सर्व मित्र परिवाराने रक्तदान आणि कार्यक्रमास सहकार्य करून लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंती निमित्त घेण्यात आलेल्या या सामाजिक उपक्रमाला उपस्थिती लावून, तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलच्या आवारात लोकशाहीच्या जयंतीनिमित्त जयघोष ऐकण्यात आला..!

## जिल्ह्यातील ई-पॉसवरील

करून कार्यान्वित करणे बंधनकारक असून मुदतीनंतर डे झेड मशीन (जुनी) असलेल्या खत विक्रेत्यांना अनुदानित रासायनिक खतांची खरेदी-विक्री करता येणार नाही, अश्या सूचना कृषी विभागाकडून देण्यात आल्या आहेत.

ज्या खत विक्रेत्यांनी अद्याप एल १ सेक्युरिटी-ई-पॉस मशिन प्राप्त केले नाही, त्यांनी जिल्हा परिषदेच्या जिल्हा कृषी विकास अधिकारी यांच्या कार्यालयाशी तत्काळ संपर्क साधावा.

साहिल सय्यद, जिल्हा कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, बीड

## पूर्ववत असणारी एक रुपया

अशी मागणी मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र शासन यांच्याकडे बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र यांच्या वतीने निवेदनाद्वारे केलेली होती तरी त्याची दखल शासनाने घेतली नाही.

शेतकरी ग्राहक केंद्रबिंदू म्हणून ही पूर्ववत असणारी पिक विमा योजना चालू ठेवावी नसता आर्थिक परिस्थितीमुळे शेतकरी वर्ग अडचणीत आल्यानंतर महाराष्ट्रात सर्वात जास्त आत्महत्या होतात यावर शासनाने लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. याप्रकरणी सहानुभूतीपूर्वक विचार करून एक रुपया पिक विमा योजना तात्काळ पुन्हा लागू करावी व पिक विमा योजनेस मुदतवाढ मिळावी. अशी मागणी बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र उपाध्य क्ष अनिल बोर्डे यांनी निवेदनाद्वारे माननीय मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य व मा. कृषी मंत्री महाराष्ट्र राज्य निवेदनाद्वारे केलेली आहे.

## मोहम्मद रफींच्या सदाबहार

यांनी गाणी सादर केली. रफी साहेबांच्या एकापेक्षा एक अशा रोमँटिक, दर्दी सदाबहार आणि देशप्रेमावरील गाण्यांसह रफी साहेबांच्या नावाने ना फनकार तुझसा तेरे बाद आया, मोहम्मद रफी तू बहुत याद आया या गाण्याने रफी साहेबांना श्रद्धांजली वाहण्यात आली. संपूर्ण कार्यक्रमाचे खुमासदार सूत्रसंचालन गायक, निवेदक तथा गीतकार आकाश जाधव यांनी अत्यंत कल्पकतेने केले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्व रसिक श्रोत्यांसह या कार्यक्रमास वृत्तपत्रातून ठळक प्रसिद्धी दिलेल्या सर्व वृत्तपत्रांचे संपादक व पत्रकारांचे, आयोजक एम.एम.शेख आणि मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी मनस्वी आभार व्यक्त केले.

## डॉक्टर दत्ता नलावडे डिलीट

लक्ष्मीबाई केंद्रीय कृषी विद्यालय झाशी तसेच अतिथी माननीय डॉक्टर सुवर्णलता पांचाळ रिसर्च सायंटिस्ट अखिल भारतीय आयुर्वेद संस्थान नई दिल्ली तसेच मुख्य वक्ता माननीय दीपा मिश्राजी ,प्रसिद्ध व्याख्याता तसेच विशेष अतिथी माननीय डॉक्टर विश्वनाथ पाणीग्रहणजी राष्ट्रीय पर्यावरण व वर्ल्ड रेकॉर्डधारी छत्तीसगड इत्यादी मान्यवर यांच्या उपस्थितीत पदवी समारंभ समारंभ झाला. यावेळी सन्मान पत्र देऊन डॉक्टर दत्ता नलावडे यांना ही पदवी मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. हा कार्यक्रम दिल्ली येथे हॉटेल रेडिसन ब्ल्यू येथे संपन्न झाला.नलावडे सरांनी त्याचे शिक्षण दीनदयाल शोध संस्थान संचलित डोमरी गुरुकुल येथे श्री . सुदाम काका

पान १/४ वरून

भोंडवे यांच्या मार्गदर्शनाखाली बारा वर्षे शिक्षण घेतलेले आहे. परमपूजनीय भारतरत्न नानाजी देशमुख ,के .डी .जोशी ,डॉक्टर सुभाष जोशी ,डॉक्टर पि .के कुलकर्णी दादा , जाहीर दादा पाटील या सर्वांच्या सानिध्यामुळे नलावडे सरांना सुरवातीपासूनच पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या गोष्टी ऐकण्याचा व परमपूज्य नानाजींच्या सानिध्यात व सुदाम काका यांच्या सहवासात राहण्याचा योग आला. आज हा सन्मान सुद्धा पंडित दीनदयाल उपाध्याय हिंदी विद्यापीठ यांच्याकडून देण्यात येत आहे. त्यांना मार्गदर्शक म्हणून डॉक्टर शिवाजी शिंदे यांनी काम पाहिले. अत्यंत उत्तम पद्धतीने मार्गदर्शन केल्याने तसेच महाराष्ट्रातून मोजक्याच लोकांमध्ये व बीड जिल्ह्यातील दोन लोकांमध्ये नलावडे सरांचे या सन्मानासाठी नामांकन झाले. या सन्मानामुळे त्याचं अनेक स्तरातून स्वागत होत आहे. महाराष्ट्र गुरुकुल शिक्षण व संशोधन परिषदेचे सर्व सन्माननीय संचालक ,शिक्षण विभागातील मान्यवर मंडळी ,बालविकास सामाजिक प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी ,संस्कृती विद्यालयातील सर्व शिक्षक ,बालगोपाळ व पालक वृंद यांच्याकडूनही नलावडे सरांवर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## सौंदाना येथे असर इंडिया

तंत्र तसेच पाण्याशी संबंधित आजार व त्यावरील प्रतिबंध याविषयी सखोल मार्गदर्शन करण्यात आले. प्रशिक्षक म्हणून जिल्हा समन्वयक पर्यावरण कारभारणी बीड चतुराबाई क्षीरसागर व पर्यावरण सखी सौ पार्वती राजू गायके यांनी आपल्या भूमिका पार पाडल्या. ग्रामपंचायत कार्यालय सौंदाना येथील सरपंच सर्व पदाधिकारी पर्यावरण सखी सौ पार्वती राजू गायके व सौंदाना येथील ग्रामस्थ यांनी प्रशिक्षण शिबिराचे उत्कृष्ट आयोजन केले. प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष श्री राजू गायके व तंटामुक्ती अध्यक्ष श्री कहानू गिनाजी गायके यांनी केले, तर आभारप्रदर्शन लघु पाटबंधारे बीड विभाग क्र-३ अंतर्गत असणारे कर्मचारी श्री चिंतामण रुस्तुम मोरे यांनी केले. एकूण २०/२१ प्रशिक्षणार्थींनी हे प्रशिक्षण पूर्ण केले असून सर्वांना यशस्वी व सहभागासाठी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. या उपक्रमामुळे ग्रामस्तरावर सुरक्षित पाण्याबाबत जनजागृती निर्माण होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला. यावेळी जिल्हा समन्वयक पर्यावरण कारभारणी बीड चतुराबाई क्षीरसागर सौंदाना येथील पर्यावरण सखी सौ पार्वती राजू गायके, तंटामुक्ती अध्यक्ष श्री कहाणू गिनाजी गायके, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष बीड श्री गायके राजू माजी सरपंच श्री गोरख गायके ग्रामरोजगार सेवक श्री बाळासाहेब दिलीप गायके, श्री विलास विष्णू कथले अंगणवाडी कार्यकर्ते सुरेखा शरद गायके, सौ सविता नारायण काकडे सौ विद्या विलास कथले, श्री दिलीप श्रीरंग गायके श्री गोवर्धन कथले, श्री वैजनाथ चव्हाण आदि गावकरी व ग्रामस्थ उपस्थित होते.

## अनिलराधे मित्र मंडळाच्या वतीने

उध्दव अरे, पत्रकार सुभाष नाकलगावकर, सुनिल थोरात,राज गायकवाड,हनुमंत तुपसौंदर,सदानंद प्रधान,प्रदीप तांबे, अभिजित देडे, किरण ढगे,मल्हारी ढगे,आकाश थोरात,विलास लोंढे,दत्ता कांबळे, विशाल कांबळे, किरण कांबळे, प्रविण कांबळे, धुराजी कांबळे, सागर कांबळे, मनोज कांबळे, रोहित कांबळे, पांडू कांबळे,राजू कांबळे,धुराजी आडागळे,अलझेंडे यांची उपस्थिती होती. मोठ्या थाटात कार्यक्रम पार पाडला. शाहीर शितल साठे, युवराज ढगे, गायक सुमित साळवे आणि संच यांच्या गायनाचा कार्यक्रमाने जन्मोत्सवाला रंगत आणली. जन्मोत्सव यशस्वी करण्यासाठी जयंती कमिटीचे अध्यक्ष विक्रम कांबळे, संयोजक रोहित भिसे, उपाध्यक्ष संकेत कांबळे, कोषाध्यक्ष युवराज कांबळे, सहकोषाध्यक्ष शुभम भिसे, सिध्देश्वर कांबळे, शाम कांबळे, प्रदीप कांबळे, सुहास क्षिरसागर, मयूर कांबळे यांचेसह अनिलराधे कांबळे मित्र परिवाराच्या सदस्य, कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## हाजीपूर येथे आज महंत

महाराज खाडे,महंत त्रिविक्रमानंद शास्त्री यांचे कीर्तन झाले. आज शुक्रवार दि.१ आगस्ट २०२५ रोजी महंत विठ्ठल महाराज गहिनीनाथगडकर यांचे दुपारी १ ते ३ या वेळात काल्याचे कीर्तन होणार आहे.या सप्ताहात गायनाचार्य म्हणून ह.भ.प.राजदीप महाराज आंधळे, ह.भ.प.अक्षय महाराज गर्जे, ह.भ.प.देविदास महाराज बर्डे व हाजीपूर भजनी मंडळ काम पाहत आहेत.मृदंगाचार्य :- ह.भ.प.बाळकृष्ण महाराज राऊत, ह.भ.प.माऊली महाराज वांढरे, हार्मोनियम ह.भ.प. बाबासाहेब महाराज वाल्हेकर हे काम पाहत आहेत.

## टिपरे महोत्सवात ओम

रोजी गेवराई शहरातील बाजार तळावर टिपरे महोत्सवाचे आयोजन

पान १/४ वरून

करण्यात आले होते. शंभर वर्षाची परंपरा लाभलेल्या टिपरी व सोंग कला प्रकाराचा आस्वाद घेण्यासाठी गेवराई शहरातील तसेच परिसरातील महिला मुले आणि नागरिकांनी गर्दी केली होती. स्पर्धेमध्ये ११ संघ सहभागी झाले होते. टिपरे स्पर्धेत प्रथम ओम ग्रुपला रोख ३३३३३ रुपये व स्मृतिचिन्ह, द्वितीय संघर्ष ग्रुपला रोख २२२२२ रुपये व स्मृतिचिन्ह, तृतीय जगदंबा ग्रुपला रोख ११११ रुपये व स्मृतिचिन्ह आणि उत्तेजनार्थ रोख ५५५५ रुपये व स्मृतिचिन्ह अनुक्रमे सावतानगर व झुंजार ग्रुपला प्रदान करण्यात आले. उत्कृष्ट पात्र सजावटीमध्ये प्रथम पारितोषिक रोख रुपये ५००० आणि स्मृतिचिन्ह झुंजार गटाच्या स्पर्धकाला मिळाले. फासावर लटकलेला शेतकरी हे पात्र त्यांनी सादर केले होते. द्वितीय पारितोषिक रुपये ३००० रोख व स्मृतीचिन्ह यांना तर तृतीय पारितोषिक रोख रुपये २००० व स्मृतीचिन्ह क्रांती ग्रुपच्या बंजारा महिलेचे वेशभूषा केलेल्या कलाकाराला. उत्कृष्ट पात्र सजावटीमध्ये लक्षवेधी पात्र सजावट मध्ये रोख रुपये १००९ व स्मृतिचिन्ह अनुक्रमे शिवछत्र ग्रुपच्या काळा शंकर, गणेशनगरच्या अर्धनारी नटेश्वर, अमिताभ बच्चनची वेशभूषा केलेला कलाकर, बळीवंश मोटे ( नृत्यांगना), कुचीपुडी संघर्ष ग्रुप, कृष्णाचे निळी वेशभूषा छत्रपती ग्रुप तर झुंजार ग्रुपच्या पांढरी चेटकीन या पात्रात मिळाले. उत्कृष्ट उत्कृष्ट सोंग मध्ये प्रथम रोख ५००० व स्मृती चिन्ह कोळी परिवाराचे सोंग घेतलेल्या कलाकारांना मिळाले तर द्वितीय रोख ३००० रुपये व स्मृतीचिन्ह जगदंबा ग्रुपच्या सिंधुताई सपकाळ यांचे सोंग घेतलेल्या कलाकाराला मिळाले. तृतीय रोख २००० रुपये व स्मृतीचिन्ह गणेश नगर ग्रुपच्या छत्रपती शिवरायांची वेशभूषा केलेल्या कलाकाराला मिळाले. उत्तेजनार्थ पारितोषिक रोख १५०० व स्मृतिचिन्ह सावता नगर ग्रुपच्या बाल वधू या सोंगाला मिळाले. उत्कृष्ट वाद्य वादन वैयक्तिक मध्ये प्रथम पारितोषिक रोख ३०००रुपये व स्मृतिचिन्ह ओम ग्रुपच्या अमरदीपला मिळाले. द्वितीय पारितोषिक रोख २००० रुपये व स्मृतिचिन्ह क्रांति ग्रुपच्या पद्माकरला संबळ वादनाबद्दल मिळाले. तृतीय पारितोषिक रोख १५०० महेश दाभाडे यांना प्रदान करण्यात आले. उत्तेजनार्थ अनुक्रमे रोख १००० रुपये व स्मृतिचिन्ह गणेश नगरच्या दिलीप मोटे आणि लल्ला उमाप यांना उत्कृष्ट वादनाबद्दल प्रदान करण्यात आले.

टिपरे महोत्सवाचे आयोजक

आ. विजयसिंह पंडित, युवानेते पृथ्वीराज पंडित, शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये सर्व विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आले यावेळी नागमंत्री या कलाप्रकारातही माटेगावच्या भजनी मंडळाचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. स्पर्धेचे परीक्षक म्हणून ड. सुभाष निकम, विलास सोनवणे, प्रशांत रुईकर, विष्णूप्रसाद खेत्रे, प्रकाश भुते यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधव चाटे यांनी केले. यावेळी टिपरे महोत्सवाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच महिला व पुरुष नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उपेक्षितांच्या व्यथा व दुःखाला

राजू जोगदंड, किसन तांगडे, अशोक लोढा, प्रकाश कानगावकर, अजय सवाई, शेख निजाम, दादा हातागळे, विकास बामणे, मायताई मिसळले, रेश्मा ताई जोगदंड, शोभा गलांडे, महेश आठवले, बापू पवार, शेख खदीरभाई, नागेश अण्णा दुबळे, प्रभाकर चांदणे,अविनाश जोगदंड, विलास जोगदंड, दिलीप खंदारे, नाना मस्के, शितलकुमार सुकाळे, भैय्या साळवे, भैय्या मस्के, सुभाष तांगडे, अरुणा निर्मळ, अनिता तुरूकमारे, उषा सोनकांबळे, कविता कोरडे, माया साबळे, अक्षय कोकाटे, सतिष शिनगारे, संभाजी गायकवाड, शाम वीर, के.के.कांबळे, नागेश शिंदे, भाऊसाहेब दळवी, नामदेव वाघमारे, रतन वाघमारे, भास्कर जावळे, नवनाथ डोळस, महेंद्र वडमारे, मनोज बोराडे, अप्पा मिसळे, पप्पू वाघमारे, गणेश वाघमारे, पिंटू गव्हाणे, दीपक कांबळे, प्रताप धन्वे, रमेश जावळे, सचिन वडमारे, जितू धन्वे, बाबू भालेराव, संजय हनवते, बबन वाघमारे, कृष्णा पाटोळे, अजिंक्य वडमारे, सोनू वडमारे, विशाल साळवे, बिभीषण जावळे, गोरख जोगदंड, प्रकाश वडमारे, रामेश्वर खळगे, सनी जोगदंड, बबलू जोगदंड, विशाल मीसळे यांच्यासह हजारो कार्यकर्तेअभिवादन रॅलीत सामील झाले होते.

# ५९ कोटींच्या नगररोडच्या दर्जाहिन कामामुळे तरुण वकिलाचा मृत्यू

## दुचाकी –कारची धडकः तिप्पटवाडी फाट्याजवळ एकाच बाजूने वाहतूक : ४ महिन्यातच रस्ता उखडला

बीड। प्रतिनिधी

अनेक वर्षांपासून रखडलेल्या बीड – अहिल्यानगर या २४ .५ किलोमीटर रस्त्याच्या कामाला सव्वा वर्षापुर्वी सुरूवात झाली. डिसेंबर २०२४ ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली होती. मात्र अद्यापही काम पूर्ण झालेले नाही.विशेष म्हणजे ४ महिन्यांपूर्वी तयार केलेल्या सिमेंट रस्त्याला काही ठिकाणी खड्डे,तडे गेल्याने,भेगा पडल्याने दुरुस्ती करण्यात येत आहे. या १५९ रूपये किंमतीच्या बेसुमार दर्जाच्या रखडलेल्या कामामुळे काल एका वकील तरुणाला आपला जीव गमवावा लागला असुन याची जबाबदारी कोणाची असा संतप्त सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे.

बुधवार दि.३० रात्री शहरानजीकच्या तिप्पटवाडी फाट्याजवळ हा अपघात झाला असुन वैभव महारूद्र सांगळे वय २५ वर्षे रा.उक्कडपिंप्री ता.गेवराई असे अपघातात ठार झालेल्या तरुण वकिलाचे नाव आहे.४



महिन्यापुर्वीच तयार केलेल्या रस्त्याला तडे,भेगा पडल्याने उकडलेल्या ,भेगा पडलेल्या ठिकाणी दुरुस्ती सुरू आहे. त्यासाठी एका बाजूचा रस्ता बंद केल्याने दोन्ही बाजूंची (अहिल्यानगर कडून येणारी आणि बीड कडुन जाणारी वाहने) वाहतूक एकाच बाजूने सुरू राहिली. दरम्यान दुचाकीला कारने धडक दिली. यात गंभीर जखमी झालेल्या वैभव सांगळे या तरुणाचा मृत्यू झाला. वैभव दुचाकीवरून राजुरीकडून बीड कडे येत असताना समोरून आलेल्या कारची दुचाकीला धडक बसून हा अपघात झाला. अनेक वर्षापासून रखडलेल्या बीड – अहिल्यानगर या महामार्गाच्या २४.५ किलोमीटर रस्ता कामासाठी १५९ कोटी रुपयांचा निधी केंद्रीय महामार्ग निधीतुन उपलब्ध झाला आहे. जून २०२४ मध्ये रस्ता कामाची सुरुवात झाली. डिसेंबर २०२४ पर्यंत काम करण्याची मुदत होती. मात्र काम संथगतीने सुरू असल्याने तीन किलोमीटर रस्ता पूर्ण झालेला नाही.

तसेच नाली व दुभाजकाचे कामही अनेक ठिकाणी अपूर्ण आहे. कामाच्या विलंबाबाबत तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी साकेत कन्स्ट्रक्शन कंपनीवर १ कोटी रुपयांचा दंड ठोठावुनही सुधारणा झालेली नाही. दरम्यान ४ महिन्यापूर्वी सिमेंट रस्ता बांधूनही उखडलेल्या भेगा पडलेल्या रस्त्याच्या दुरूस्तीचे काम सुरू आहे. तब्बल १५९ कोटी रुपये खर्चून करण्यात येत असलेल्या नगररोडचे काम ४ महिन्यांपूर्वीच झालेल्या रस्ते कामाला काही ठिकाणी खड्डे तर काही ठिकाणी तडे,भेगा पडलेल्या आहेत. संबंधित प्रकरणात तक्रार केल्यानंतर महामार्ग प्राधिकरण बीड विभाग अभियंता राजेंद्र भोपळे म्हणतात सिमेंटचा थर देताना चुकुन रेक्झिनचा एक बंच क्रांक्रीटमध्ये गेला होता तो काढताना जिल्हाधिकारी कार्यालयासमोर खड्डे पडलेले आहेत.खड्डे बुजविण्यात आले असुन काम दर्जेदारच झाले आहे.आठ ते दहा ठिकाणी उकडलेल्या,भेगा पडलेल्या रस्त्याच्या ठिकाणी दुरूस्तीचे काम सुरू असुन काम करताना बॅरिकेट्स व तत्सम सर्व उपाययोजना करून दिशादर्शक ही लावण्यात आले आहेत. असे म्हणत दर्जाहीन कामाला दर्जेदार कामाचे प्रशस्तिपत्र देऊन टाकत आहे. एकंदरीतच डॉ.राजेंद्र भोपळे कंत्राटदाराची पाठराखण करताना दिसुन येत आहे.

## अलहुदा उर्दू हायस्कूल, येथे बेसिक मॅथ्स वर्कशॉप

बीड । प्रतिनिधी

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी सतत नवनवीन उपक्रम राबविणाऱ्या नूर एज्युकेशनल अ‍ॅण्ड वेल्फेअर सोसायटी द्वारा संचालित अलहुदा उर्दू हायस्कूल, बीड येथे दिनांक २८ जुलै २०२५ रोजी दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी ''बेसिक मॅथ्स वर्कशॉप'' चे आयोजन करण्यात आले. अडीच तास चाललेल्या या कार्यशाळेचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांच्या गणित विषयातील भीती दूर करून त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करणे हा होता.

कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून गणिततज्ञ व प्रसिद्ध ट्रेनर वकील शब्बीर शेख (धाराशिव, उस्मानाबाद) यांनी अतिशय सोप्या, प्रभावी आणि संवादात्मक पद्धतीने दहावीच्या विद्यार्थ्यांना मूलभूत गणिती संकल्पना समजावून सांगितल्या. संख्यांचे स्वरूप, गणिती सूत्रांचा वापर, परीक्षेतील तंत्र, तसेच वेळेचे नियोजन या बाबींवर त्यांनी विशेष भर दिला. उपस्थित विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साहाने सहभाग नोंदवला आणि त्यांचे समाधानही व्यक्त केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी



मुख्याध्यापक डॉ. सिराज खान यांनी प्रास्ताविकात कार्यशाळेचे उद्दिष्ट स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, ''विद्यार्थ्यांचे गणितातील मूलभूत आकलन बळकट व्हावे आणि त्यांचा आत्मविश्वास वाढावा, हाच या उपक्रमाचा मुख्य हेतू आहे. अशा उपक्रमांच्या माध्यमातून आम्ही त्यांच्या शैक्षणिक भवितव्यास आधार देण्याचा प्रयत्न करतो.''कार्यशाळेच्या प्रारंभी वकील शेख यांचे फूल देऊन औपचारिक स्वागत करण्यात आले. यावेळी शाळेतील शिक्षकवृंद उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन परीक्षा प्रमुख शेख मोईजुद्दीन यांनी केले. त्यांनी सर्व उपस्थितांचे, विशेषतः वकील शब्बीर शेख सरांचे आभार मानले की,''त्यांच्या प्रेरणादायी आणि समर्पित मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना गणित विषयाकडे पाहण्याचा दृष्टिकोनच बदलला.''शाळेतील दहावीचे सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यशाळेच्या शेवटी विद्यार्थ्यांनी स्वतः अनुभव सांगत वकील सरांच्या शिकवणीचे कौतुक केले. काही विद्यार्थ्यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, ''आम्हाला आता गणितात भीती वाटत नाही, उलट सोप्या पद्धतीने शिकवले तर गणित खूपच रंजक वाटते.'' हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीस निश्चितच दिशा देणारा ठरेल, अशी सर्वांची भावना होती.

## युनिटी ऑफ मूलनिवासी समाज यांच्या वतीने २ ऑगस्ट रोजी विशेष जिल्हा सम्मेलनाचे आयोजन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

**युनिटी ऑफ मूलनिवासी समाज यांच्या वतीने अंबाजोगाईत शनिवार, दिनांक २ ऑगस्ट रोजी विशेष जिल्हा सम्मेलनचे आयोजन करण्यात आले आहे. या सम्मेलनात विविध विषयांवर मौलिक चिंतन, चर्चा होणार आहे. तरी या सम्मेलनात बीड जिल्ह्यातील मूलनिवासी समाजाने उपस्थित राहून सहभागी व्हावे असे आवाहन गोविंद सोन्नर (राज्य महासचिव, युनिटी ऑफ मूलनिवासी समाज, महाराष्ट्र) यांनी केले आहे.**

युनिटी ऑफ मूलनिवासी समाज, बीड यांच्या वतीने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, राजमाता अहिल्याबाई होळकर त्रिशताब्दी जयंती वर्ष, जोशी वतन बिल, आरक्षण दिन, साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आणि दुसरे महाराष्ट्र राज्य अधिवेशनच्या तयारी अंतर्गत – अंबाजोगाई शहरात शनिवार, दिनांक २ ऑगस्ट रोजी वेळ : सायंकाळी ६ ते ९.३० वाजेपर्यंत पत्रकार भवन, नगरपरिषद, अंबाजोगाई (जि.बीड.) या ठिकाणी विशेष जिल्हा सम्मेलन आयोजित करण्यात आले आहे. सम्मेलनाचे उद्घाटक म्हणून ॲड.किशोर गिरवलकर (ओबीसी आंदोलनाचे वरिष्ठ मार्गदर्शक) तर अध्यक्षस्थानी कमलाकांत काळे (राष्ट्रीय अध्यक्ष, युनिटी ऑफ मूलनिवासी समाज) हे असणार आहेत. यावेळी अखिल खतीब (जमियत-ए-उलेमा मराठवाडा संघटक), रामकिसन मस्के (ज्येष्ठ मार्गदर्शक, मराठा सेवा संघ, बीड), इंजि.प्रभाकर कांबळे (आंबेडकरी चळवळीचे अभ्यासक), भगवान गडदे (अध्यक्ष, स्वामी विवेकानंद पतसंस्था, अंबाजोगाई.), डॉ.योगेश सुरवसे (ज्येष्ठ अधिव्याख्याता, डायट, अंबाजोगाई), रवी वत्सला वामन आडे (प्रसिद्धीप्रमुख, गोर सेना), मधुकर सुरवसे (तालुकाध्यक्ष, नाभिक महामंडळ, अंबाजोगाई.), बिबिषण चाटे (वंचित बहुजन युवा, जिल्हा महासचिव, बीड.), नवनाथ चौरे (अहिल्याबाई होळकर जयंती उत्सव समिती, अंबाजोगाई), अमोल काळे (ज्येष्ठ शिक्षक, गेवराई), लक्ष्मण वैराळ (बहुजन आंदोलन अभ्यासक, परळी) या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यावेळी पुढील विषयांवर मौलिक चिंतन आणि चर्चा होणार आहे. विषय – १) जाती जनगणना, एनपीआर आणि अनुसूचित जाती – जनजाती आरक्षणातील उपवर्गीकरण शासक वर्गाची भूमिका – एक गंभीर विश्लेषण, २) एनपीआर हीच खरी एनआरसी !, आणि ३) स्वर्णिम भारताच्या पुनर्निर्मितीमध्ये विद्यार्थी, युवा, महिला आणि बुद्धिजीवी वर्गाची भूमिका अर्थात मूलनिवासी बहुजन समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक ध्रुवीकरणा शिवाय ब्राह्मणी धार्मिक ध्रुवीकरणाचा मुकाबला करता येणार नाही. असे विषय आहेत. तरी बीड जिल्ह्यातील मूलनिवासी समाजातील विविध क्षेत्रात कार्यरत मान्यवर, विद्यार्थी, युवा, महिला आणि बुद्धिजीवी वर्गाने उपस्थित राहून सहभागी व्हावे असे आवाहन निवेदक : युनिटी ऑफ मूलनिवासी समाज, बीड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## कारगिल युद्धातील माजी सैनिकाला नागरिकत्व सिद्ध करण्यास भाग पाडल्याचा आरोप

**पुणे । प्रतिनिधी**

कारगिल युद्धात भारतातील शेकडो जवानांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले. भारतासाठी ही लढाई अत्यंत निर्णायक आणि ऐतिहासिक होती. पण याच कारगिल युद्धात लढलेल्या एका जवानाची नागरिकता सिद्ध करण्यास भाग पाडल्याचा गंभीर आरोप निवृत्त सैनिक हकीमुद्दीन शेख यांच्या कुटुंबियांकडून करण्यात आला आहे. वडिलांनी देशासाठी लढा दिला, आज त्यांना नागरिकत्व सिद्ध करायला सांगितलं जात आहे, अशी प्रतिक्रिया हकीमुद्दीन शेख यांच्या नातेवाइकांनी दिली. १९९९ च्या कारगिल युद्धात सहभागी झालेल्या हकमुद्दीन शेख यांच्या कुटुंबाने ही कारवाई अनपेक्षित आणि अपमानकारक असल्याचे म्हटले आहे.

पोलिसांसह ३० ते ४० जणांच्या गटाने त्यांच्या चंदननगर येथील राहत्या घरी छापा टाकत त्यांना त्यांच्या भारतीय नागरिकत्वाचा पुरावा सादर करण्यास भाग पाडले.ही घटना शनिवारी (२७ जुलै) रात्री उशिरा घडली. मध्यरात्री काही लोकांनी घरी येऊन ओळखपत्रे आणि अन्य कागदपत्रांची मागणी केली. त्यानंतर घरातील पुरुष सदस्यांना पोलिस ठाण्यात नेण्यात आले.

५८ वर्षीय हकीमुद्दीन शेख यांनी १९८४ साली लष्कराच्या २६९ अभियंता रेजिमेंटमध्ये भरती होऊन तब्बल १६ वर्षे सेवा दिली. १९९९ च्या कारगिल युद्धातही त्यांनी सहभाग घेतला होता. २००० मध्ये निवृत्त झाल्यानंतर काही काळ प्रतापगडमध्ये वास्तव्य केले, मात्र त्यांचे कुटुंब आजही पुण्यात वास्तव्यास आहे. त्यांचे मूळ गाव उत्तर प्रदेशातील प्रतापगड असून, १९६० पासून त्यांचे कुटुंब पुण्यात राहत आहे. तर हकीमुद्दीन शेख म्हणाले, मी १६ वर्षे भारतीय सैन्यात अभिमानाने सेवा दिली. १९९९ च्या कारगिल युद्धात लढलो. माझे संपूर्ण कुटुंब भारतीय आहे. मग आज आम्हाला आमचे नागरिकत्व सिद्ध करावे लागत आहे?असं म्हणत माजी सैनिक हकीमुद्दीन शेख यांनी उद्विग्न प्रतिक्रिया दिली आहे. २६ जुलैच्या रात्री पुण्यातील चंदननगर परिसरात, हकीमुद्दीन शेख यांच्या कुटुंबाच्या घरी पोलिसांसह ३० ते ४० लोकांनी धाड घालून कागदपत्रांची मागणी केली, असा गंभीर आरोप त्यांच्या कुटुंबीयांनी केला आहे.

## महापालिकेच्या शाळांमध्ये १८४ शिक्षक पदे रिक्त–काळभोर यांचे शिक्षण सहायक आयुक्त किरणकुमार यांना निवेदन

पिंपरी । प्रतिनिधी

स्मार्ट सिटी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पिंपरी-चिंचवड शहरातील महापालिकेच्या शाळांमध्ये शिक्षकांची मोठ्या प्रमाणात कमतरता आहे. प्राथमिक शाळांमधील तब्बल १८४ शिक्षक पदे रिक्त आहेत. काळभोरनगर येथील स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्या मंदिर शाळेत १५० विद्यार्थ्यांसाठी केवळ दोन शिक्षक कार्यरत आहेत. ही परिस्थिती विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर गंभीर परिणाम करणारी आहे.



यासंदर्भात युवा नेते विशाल बाळासाहेब काळभोर यांनी शिक्षण विभागाचे सहायक आयुक्त किरणकुमार मोरे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. त्यांनी सर्व शाळांमध्ये तातडीने शिक्षकांची कंत्राटी पद्धतीने भरती करण्याची मागणी केली.

महापालिका १०५ प्राथमिक व १८ माध्यमिक शाळा चालवत आहे. या शाळांमधून सुमारे ५० हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यंदाच्या शैक्षणिक वर्षाची पहिली घटक चाचणी परीक्षा ४ ते ६ ऑगस्ट दरम्यान होणार आहे. शिक्षक नसल्याने विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे. यावर मोरे यांनी ऑगस्टअखेर रिक्त पदे भरली जातील, असे आश्वासन दिले आहे.

## दिव्यांग बांधवांमध्ये प्रचंड प्रतिभा असून त्यांना सर्वोत्तम सुविधा द्या : आयुक्त

**पिंपरी । प्रतिनिधी**

महापालिकेच्या दिव्यांग भवन फाउंडेशनच्या माध्यमातून शहरातील दिव्यांग बांधवांच्या उन्नतीसाठी वेगवेगळे उपक्रम राबविले जात आहेत. प्रत्येक नागरिकांमध्ये वेगवेगळी प्रतिभा दडलेली असते. त्याचप्रमाणे दिव्यांग बांधावांमधील प्रतिभा ओळखा व त्यानुसार त्यांना कामांचे वाटप करा. महापालिकेमधील सर्व दिव्यांग कर्मचाऱ्यांशी विभाग प्रमुखांनी चर्चा करावी, त्यांच्या अडचणी समजून घ्याव्यात, त्यानुसार दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियमानुसार त्यांना सुविधा उपलब्ध करून द्या, असे निर्देश महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी दिले.

पिंपरी चिंचवड महापालिका आणि दिव्यांग भवन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील महत्त्वपूर्ण तरतुदी व माहिती याविषयी सर्वसमावेशक जनजागृती निमित्त आयोजित एक दिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन आयुक्त सिंह यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. आयुक्त सिंह म्हणाले, ''महापालिका अधिकाऱ्यांनी दिव्यांग व्यक्ती अधिनियम २०१६ काय आहे, हे या कार्यशाळेच्या माध्यमातून सविस्तर समजावून घ्यावे. त्यानुसार महापालिकेमध्ये काम करणाऱ्या दिव्यांग बांधवांशी संवाद साधावा. त्यानुसार त्यांच्यामधील प्रतिभा ओळखावी, त्यांच्या मर्यादा ओळखा, व त्यानुसार कामांचे वाटप करा. पुढील




काळात शहरातील औद्योगिक क्षेत्रातील दिव्यांग बांधवांसाठी देखील अशीच प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करा.''

समाज विकास विभागाच्या उप आयुक्त ममता शिंदे यांनी प्रास्ताविक केले. दिव्यांग भवन फाउंडेशनच्या मानस शास्त्रज्ञ अपर्णा चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले. धनश्री नलावडे व माधुरी गाडेकर यांनी दुभाषक म्हणून काम पाहिले. दिव्यांग भवन फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी परेश गांधी यांनी आभार मानले.

# साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांचे विचार : आपल्या समोरील आजची आव्हाने !


माझी मैना गावावर राहिली ! माझ्या जीवाची होती या काहीली'!!.

या कवणाद्वारे आपले महाराष्ट्र प्रेम व निष्ठा व्यक्त करणारे साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे. अशा साहित्य रत्नाचा जन्म वाटेगाव जि. सांगली येथे १ ऑगस्ट १९२० रोजी भाऊ साठे यांच्या कुटुंबात झाला. त्यांचे नाव 'तुकाराम' असे ठेवण्यात आले होते. छत्रपती शिवाजी महाराज यांचे गुरु संत तुकाराम महाराज यांच्या नावावरून त्यांचे नाव ठेवले गेले.

घरात ते थोरले असल्यामुळे लहान भाऊ आणि बहीण त्यांना अण्णा असे संबोधित असत. वाटेगाव हे औंध संस्थानात होते , तेव्हा दलितांच्या मुलांना वेगळी शाळा होती. शिक्षक सवर्ण असल्यामुळे ते दलित मुलांना दूरवर बसूनच त्यांच्या पाठीवर धडे देत असत. पहिल्या दिवशी गिरवणयासाठी दिलेली काही मुळाक्षरे दुसर्या दिवशी अण्णांनी पाठीवर लिहिलेले नव्हते. म्हणून मास्तरांनी अण्णांना फार मोठी शिक्षा केली. त्या दिवसापासून अण्णांनी शाळेकडे पाठ फिरवली.

मातंग समाजाला त्याकाळी पिढी जात गुन्हेगारी म्हणून संबोधिले असल्यामुळे दारिद्र्य आणि गुन्हेगारी अशा दोन्ही संकटाचा सामना करावा लागला. १९२५ मध्ये गुन्हेगार जमातीच्या वसाहतीचा कायदा संमत झाला व तो मातंग समाजावर लादला गेला. कुठे काही घडले की मातंग समाजाच्या घरांची झाडाझडती घेतली जात असे . जोपर्यंत गुन्हेगार सापडत नाही तोपर्यंत मातंग समाजातील पुरुषांना सळो कि पळो करून सोडत असत .अशा परिस्थितीत अण्णांच्या कुटुंबात माणसांची संख्या अधिक असल्यामुळे उपासमारी ही नित्याचीच बाब होती.

म्हणून वडिल भाऊ साठे यांनी उदरनिर्वाहासाठी मुंबईला जाण्याचे ठरविले .परंतु पैशाच्या अडचणी असल्यामुळे वाटेगाव ते मुंबई हे अंतर पायी चालून गेले. मिळेल ते काम करू लागले. अण्णाभाऊ यांचे चुलत बंधू ज्ञानदेव यांची भेट मुंबईला झाली. ज्ञानदेव पाचवी ते सातवी पर्यंत शिकलेले होते. त्यांच्या घरामध्ये देव देवतांचे फोटो आणि पुस्तके



होती. पुस्तकांची ही थप्पी पाहून अण्णा भाऊ थकित झाले.त्यांची तीक्ष्म नजर फोटो व पुस्तके यावर बसली होती. आणि मलाही जमेल का? म्हणून विचारले. आपले बंधू ज्ञानदेव यांच्याकडून अण्णाभाऊ विविध पुस्तकांचे वाचन करून घेत ऐकत. असे एक वर्ष फक्त ऐकले. ऐकून ऐकून आण्णांनी पुस्तके तोंड पाठ केली ज्ञानदेवाच्या संगतीमध्ये अक्षर ओळख झाली ते वाचू लागले एक वर्ष त्यांनी कोणतेही काम केले नाही. वाटेगाव मध्ये ब्राह्मण शिक्षकाने मारल्यामुळे अण्णा भाऊंची शाळा सुटली परंतु मुंबईमध्ये त्यांच्या चुलत भावाकडून त्यांनी वाचनाची आणि लिहिण्याची कला हस्तगत केली.

अण्णाभाऊ साठे यांच्या २६ कथासंग्रहातून सुमारे १३० कथा प्रकाशित झाल्या. संपूर्ण कथा लेखनातून अण्णाभाऊंच्या बंडखोर मनाने घेतलेली अनुकृतीच अनुभव व्यक्त झाले. समाजातील शोषण ,अन्याय, अत्याचार दारिद्र्य ,विषमता ,लाचारी बलात्कार ,अंधश्रद्धा, जातीयता पाहून अण्णाभाऊ अस्वस्थ होते आणि त्यांचे मन पेटून उठत होते . आर्थिक विषमते सोबतच सामाजिक विषमतेचे चित्रणही अण्णाभाऊंच्या कथा मधून पुढे येते. अण्णाभाऊंच्या साहित्यात कल्पनेला वाव नव्हता. प्रत्यक्ष जीवनामध्ये अण्णांनी सोसलं ,अनुभवलं प्रत्यक्ष पाहिलं तेच आपल्या लेखणीतून उभं केलं. अण्णांनी आपल्या लिखानात संयुक्त महाराष्ट्र चळवळ मुंबई महाराष्ट्र ला मिळाली पण बेळगाव हे कर्नाटक मध्ये विलीन करण्यात आले. तेव्हा अण्णाभाऊंनी कवन रचून आपले महाराष्ट्र प्रेम व्यक्त केले. 'माझी मैना गावावर राहिली ,! माझ्या जीवाची होती या काहीली'!!.

अण्णाभाऊ स्वतःच मोठे आहेत त्यांना कोणी मोठे करत नाहीत किंवा अण्णाभाऊ महान आहेत यासाठी कोणाच्या प्रमाणपत्राची आवश्यकता नाही.

ज्यावेळी त्यांचे वय २८ होते तेव्हाच १९४८ ला पॅरिस येथे भरणाऱ्या जागतिक साहित्य परिषदेचे निमंत्रण अण्णाभाऊंना मिळाले होते. १९६१ मध्ये विंडोसोवियत कल्चर सोसायटीने अण्णाभाऊंना रशियाला बोलविले. दीड दिवस शाळेत जाऊन अफाट असे साहित्य निर्माण केले. वीस कथासंग्रह यामध्ये जवळपास ३०० कथा आहेत. ४० कादंबऱ्या पोवाडे , नाटक , लोकनाट्य लावण्या, प्रवासवर्णन, शाहिरी . सात कादंबऱ्यावर चित्रपट असा लिखाणाचा थक्क करणारा प्रवास आहे.

त्यांच्या बऱ्याच कथा या आंबेडकरवादी आहेत. त्यापैकी एक असणारी 'बुद्धांची शपथ' या कथेमध्ये जातीव्यवस्था आणि प्रस्थापितांच्या विरोधात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतर केले होते त्या धर्मांतराचा प्रभाव गाव खेड्यातील महार जातीवर पडला होता. बौद्ध धर्माने झालेला सकारात्मक बदल सूक्ष्म निरीक्षणाद्वारे अण्णाभाऊ म्हणतात , जग बदल घालूनी गाव सांगून गेले मला भीमराव ! गुलामगिरीच्या या चिखलात रुतून बसला का ऐरावत। अंग झाडून निघ बाहेर घे बिनी वरती घाव।। सांगून गेले मला भीमराव ।।

बुद्धाची शपथ ही कथा लिहून अण्णाभाऊंनी एक प्रकारे 'स्वयंप्रकाशित व्हा' हा मार्ग दाखवला.

भारतातील जातीव्यवस्था नष्ट करण्याचे दृष्टीने कम्युनिस्ट विचारधारा अपुरी आहे याची जाणीव अण्णाभाऊंना झालेली होती. त्यामुळे उत्तर आयुष्यात अण्णाभाऊ आंबेडकरमय अर्थात आंबेडकरवादी झाले होते. अण्णाभाऊ साठे हे पहिले आंबेडकरी कथा लेखक आहेत याची नोंद मराठी वाङ्‌ममय इतिहासाने न घेणे हा त्यांच्यावरील फार मोठा अन्याय ठरेल . अण्णाभाऊ साठे यांची बहुतांशी साहित्य फुले –शाहू –आंबेडकर यांच्या विचारसरणीला पुढे घेऊन जाणारे आहेत.



अण्णाभाऊ साठे यांची 'फकीरा' कादंबरी डॉ. बाबासाहेबांच्या झुंजार लेखणीला अर्पण करून अण्णाभाऊ साठे यांनी संघर्ष करा ,लढा द्या हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मार्ग दाखवतात .

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले होते की, मी हा रथ फार मोठ्या कष्टाने व श्रमाने ओढत आणला आहे. त्याला पुढे नेता येत नसेल तर जागीच राहू द्या. परंतु कदापिही मागे जाता कामा नये. याचा मतीत्तार्थ म्हणजे आपल्याला जे ७ अधिकार व हक्क मिळवून दिले आहेत ते भलेही वाढविता येत नसतील तरी चालेल. परंतु ते कमी होता कामा नये.

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान सभेत एकूण ७० अधिकार व हक्क याची मागणी एससी व एसटी समूहासाठी केली होती. परंतु त्यापैकी फक्त सात अधिकार व हक्क संविधानात मिळाले आहेत. बाकी ६३ अधिकार व हक्क आपल्याला मिळणे बाकी आहे. त्यासाठी अनुसूचित जाती व जमाती मधील संघटना, पक्ष, नेते यांनी चळवळ उभी करणे आवश्यक आहे.

उत्पादन करणाऱ्या व सेवा देणाऱ्या सरकारी संस्था, कंपन्या यांचे खाजगीकरणाचे धोरण सरकारने अवलंबिले आहे. जसे की बीएसएनएल, एम एस ई बी, रेल्वे, विमान इत्यादी प्रामुख्याने मोठ्या प्रमाणात आरक्षण मिळवून देणारे क्षेत्र आपल्याला सांगता येतील. या सर्वांचे खाजगीकरण करून सरकारने आरक्षण संपविल्यात जमा आहे. त्यासाठी आपल्याला राष्ट्रीय स्तरावर आंदोलन उभे करणे गरजेचे आहे आरक्षण वाचविले तरच आपल्याला प्रतिनिधित्व करता येईल. हिंदुत्ववाद्यांच्या विचारांच्या आमिषाला बळी पडून अनुसूचित जातीतील काही संघटना, पक्ष त्यांच्या वरचणीला जाऊन बसले आहेत. त्यामुळे समाज गोंधळलेल्या अवस्थेत आहे. येथील व्यवस्थेने आरक्षण संपवण्यासाठी अनुसूचित जातीत उपवर्गीकरण अ ब क ड याचे मृगजळ दिले आहे. त्याचे समर्थन काही नेते करीत आहेत. आंबेडकरवादी विचाराची मोट एकत्र केली तर समाजाला दिशा मिळू शकते. समाजाने लक्षात घेतली पाहिजे की शिक्षण महत्त्वाचे आहे व शिक्षणासाठी पैसा आवश्यक आहे मात्र अंधश्रद्धा, यात्रा , नवस ,कंदुरी अशा खर्चिक परंपरा व प्रथेला मातंग समाज काही बांधव आज देखील चिटकून आहे. तो खर्च त्यांनी टाळावा. गॅट करारामुळे जागतिक बाजारपेठ खुली झाली आहे. त्यामुळे देशातील निर्यात त्या प्रमाणात फार कमी आहे. ज्या प्रमाणात आयात सुरू आहे. स्थानिक उद्योगधंदे व रोजगार कमी झाला आहे त्यामुळे आजचा आपला तरुण वैफल्यग्रस्त झाला आहे .त्याला दिशा देण्याचे काम आंबेडकरवादी म्हणून आपण करणे आवश्यक आहे. नव्हे ती आपली जबाबदारीच आहे. आपण सर्वांनी मिळून हि जबाबदारी स्वीकारणे म्हणजेच साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना खरे विनम्र अभिवादन ठरेल.

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

**प्रा.शशिकांत जावळे**
९४२३४७३२०४

BEED PRARAMBH Newspaper Prin ed, Published and Owned by Jalinder Dnyandev Dhande and Printed at TULJABHAVANI PRINTERS, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) and published at BEED PRARAMBH OFFICE, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) Editor : Jalinder Dnyandev Dhande

बीड प्रारंभ हे पत्रक मुद्रक, प्रकाशक, मालक जालिंदर ज्ञानदेव धांडे यांनी तुळजाभवानी प्रिंटर्स, द्वारा – ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा – बीड पिन – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड प्रारंभ कार्यालय, द्वारा – ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा – बीड पिन – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.संपादक : जालिंदर ज्ञानदेव धांडे




सायं.दैनिक
# प्रारंभ
बीड
शुक्रवार दि. ०१ ऑगस्ट २०२५






## आ. सुरेश धस यांच्या पाठपुराव्यामुळे अखेर स्व.महादेव मुंडे खून प्रकरणी विशेष तपास यंत्रणेची स्थापना

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

मुंबई । प्रतिनिधी

गेल्या २१ महिन्यांपासून न्यायाच्या प्रतीक्षेत असलेल्या स्व. महादेव मुंडे यांच्या खून प्रकरणी अखेर विशेष तपास यंत्रणा एसआयटीची स्थापना करण्यात आली असून त्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आदेश दिले आहेत आमदार सुरेश धस यांनी या हत्याप्रकरणी बसत्यात बांधलेला तपास करायला भाग पडल्याने अखेर विशेष तपस यंत्रणा स्थापन करण्यात आले असून यांच्या वतीने पुढील तपास करण्यात येणार आहे त्यामुळे स्वर्गीय महादेव मुंडे यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे या प्रकरणात सातत्याने आवाज उठवत, न्यायासाठी लढा देणारे आमदार सुरेश धस यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे मुळेच आज मुख्यमंत्री तथा गृहमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांनी विशेष तपास पथक (S.I.T.) स्थापन करण्याचे आदेश दिले आहेत.





आ. सुरेश धस यांनी आज मुंबईत स्व. महादेव मुंडे यांची पत्नी सौ. ज्ञानेश्वरी मुंडे व त्यांच्या कुटुंबीयांना सोबत घेऊन मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीत आमदार धस यांनी संपूर्ण प्रकरणाचे गंभीर तपशील, खरे आरोपी कोण आहेत तसेच आरोपींना मदत करणारे पोलीस अधिकारी कोण आहेत याची सविस्तर माहिती मुख्यमंत्र्यांसमोर ठामपणे मांडली. मुख्यमंत्री मा. श्री. फडणवीस साहेबांनी या प्रकरणाची भावनिक व गांभीर्याने दखल घेत त्वरित पोलीस उपमहानिरीक्षक (ऊखत्र) यांना ड.ख.ढ. स्थापन करण्याचे स्पष्ट आदेश दिले. या निर्णयामुळे मुंडे कुटुंबीयांना मोठा मानसिक आधार मिळाला असून, सत्य बाहेर येईल आणि गुन्हेगार कायद्याच्या तावडीत सापडतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. स्व. महादेव मुंडेंना न्याय मिळेपर्यंत हा लढा थांबणार नाही, असा ठाम निर्धार आमदार सुरेश धस यांनी या प्रसंगी पुन्हा एकदा व्यक्त केला.





## अण्णाभाऊ यांना विनम्र अभिवादन!

अण्णा भाऊसाठे यांचे साहित्य हे परिवर्तनाला दिशा व चालना देणारे ठरले आहे. महाराष्ट्राच्या एकूणच जडणघडणीत आणि परिवर्तनात या साहित्याचे योगदान हे महत्त्वपूर्ण मानले जाते. आजही मोठ्या संख्येने विद्यार्थी व अभ्यासक हे त्यांच्या या साहित्याचा संशोधनात्मक अभ्यास करताना दिसतात. संयुक्त महाराष्ट्र चळवळ लोकमानसात रुजविण्याचे काम शाहीर अण्णा भाऊ साठे, शाहीर अमर शेख आणि शाहीर द.न. गव्हाणकर यांनी केले. मुंबई, मराठवाडा, विदर्भ, कोकण, पश्चिम महाराष्ट्र तसेच सीमाभागातील अनेक ठिकाणी शाहिरांनी आपल्या लालबावटा कलापथकाचे कार्यक्रम सादर केले.अशा साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन केले या वेळी उपस्थित तुलसी शैक्षणिक समूह. संस्थेचे अध्यक्ष आदरणीय प्रा.प्रदिप रोडे सर, प्रा. राम गायकवाड, प्रा. अंकुश कोरडे, सामाजिक कार्यकर्त्या किस्किंदा पांचाळ, प्रा. किशोर वाघमारे बबन पांचाळ, आयु. अभय इंगोले सह उपस्थित होते.



लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०५व्या जयंतीनिमित्त वंचित बहुजन आघाडीच्या वतीने त्यांना अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमात जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, पुरुषोत्तम वीर, ज्ञानेश्वर कवठेकर, किरण वाघमारे, जंजाळ सर, लखन जोगदंड, प्रेम कांबळे, विवेक मस्के, अविनाश जाधव, मिलिंद सरपते यांनी उपस्थित राहून अभिवादन केले.









कडा – संघर्ष योद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त कडा येथील तीन शाळेत शालेय साहित्य वाटप करण्यात आले.यावेळी सर्व जाती धर्माचे समाज बांधव उपस्थित होते.

## जिल्ह्यातील ई–पॉसवरील खतसाठ्यात तफावत नको तफावत आढळल्यास कारवाई; कृषी विभागाची सूचना

बीड प्रतिनिधी ह्व

अनुदानित रासायनिक खताची विक्री ई–पॉस प्रणालीच्या माध्यमातून करणे बंधनकारक आहे. शिवाय खत विक्रीच्या नोंदी तत्काळ व अचूक पद्धतीने प्रणालीमध्ये समाविष्ट होणे आवश्यक आहे. तसे न झाल्यास कठोर कारवाई होऊ शकते असे कृषी विभागाने सूचित केले आहे.

यासंदर्भात कृषी विभागाने दिलेल्या माहितीनुसार, ई–पॉस प्रणालीवर अचूक खत साठा नसल्यास जिल्ह्याला आवश्यक खत मिळण्यात अडचणी येतात. याशिवाय त्यावरच खत उत्पादक कंपन्यांना अनुदान मिळत असल्याने त्यांनाही अनुदान मिळण्यात अडचणी येतात.खत विक्रेत्यांच्या ई–पॉस प्रणालीवरील खतसाठा आणि प्रत्यक्ष गोडाउनमधील खतसाठा यामध्ये कोणतीही तफावत असू नये. त्यासाठी रासायनिक खताच्या विक्रीची नोंद आयएफएमएस प्रणालीमध्ये तत्काळ घेणे व

खताची विक्री ई–पॉस प्रणालीच्या माध्यमातून करणे बंधनकारक आहे. याबाबत जिल्ह्यातील सर्व गुणनियंत्रण निरीक्षकांना पॉस मशीन वरील साठा व प्रत्यक्ष साठा पडताळणी मोहीम स्वरूपात करण्याबाबत निर्देश देण्यात आले असून जिल्हास्तरावरील भरारी पथकामार्फत देखील याबाबत यादृच्छीक पद्धतीने तपासणी करण्यात येणार आहे.

तपासणी वेळी विक्रेत्यांकडे ई–पॉसवरील खतसाठा व प्रत्यक्ष खतसाठा यामध्ये फरक आढळल्यास अशा विक्रेत्यांच्या परवान्यावर नियमानुसार कारवाई करण्याच्या सूचना परवाना अधिकारी यांना देण्यात आलेल्या आहेत. ज्या खतविक्रेत्यांनी अद्याप एल १ सेक्युरिटी–ई–पॉस मशिन प्राप्त केले नाही, त्यांनी जिल्हा परिषदेचे जिल्हा कृषी विकास अधिकारी यांच्या कार्यालयाशी तत्काळ संपर्क साधून १० ऑगस्ट पूर्वी ई–पॉस मशिन प्राप्त ▶▶ पान २ वर...

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त (५१ जणांचे) रक्तदान शिबिर संपन्न





### तिरुपती हॉस्पिटल आणि महाराजा मित्र मंडळाचें रक्तदान करून लोकशाहीरांस अभिवादन


बीड प्रतिनिधी

साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त बीड शहरात सामाजिक संदेश देण्यासाठी तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल आणि महाराजा मित्र मंडळ बीडच्या वतीने भव्य रक्तदान शिबिर आणि अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते लोकशाहीर अभिवादन करण्यात आले त्यानंतर महाराजा मित्र मंडळ आणि तिरुपती हॉस्पिटल कर्मचारी यांनी मोठ्या प्रमाणात रक्तदान करून सामाजिक उपक्रम पार पाडला. या सामाजिक उपक्रमाला उपस्थित तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल चे सर्वेसर्वा सुप्रसिद्ध मनकाविकार तज्ञ डॉ बालाजी नवले साहेब, जिल्हा रुग्णालय अतिरिक्त शल्य चिकित्सक डॉ सदाशिव राऊत साहेब, महाराजा मित्र मंडळाचे आकाश भैय्या कंडेरे,लकी भैया कंडेरे, यूवा नेते भारत आण्णा कांबळे, ▶▶ पान २ वर...

## पूर्ववत असणारी एक रुपया पिक विमा योजना बंद केल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी :- अनिल बोर्डे

गेवराई । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाने एक रुपया पिक विमा योजना यापूर्वी राबविण्यात आली होती. त्यानंतर सुधारित पिक विमा योजना लागू केल्यामुळे ३१ जुलै पर्यंत त्याला प्रतिसाद मिळालेला नाही. या योजनेपासून वंचित राहणाऱ्या शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणार आहे. या पीक विमा योजनेत शेतकऱ्याला जमिनीच्या क्षेत्राप्रमाणे प्रीमियम भरावा लागत आहे. या योजनेत पिकाची हमी कमी केलेली आहे. पिक विमा कंपनीने यातले ट्रिगर उडवले आहेत. पूर्वी अग्रीम २५% नुकसान भरपाई मिळायची ती आता मिळणार नाही.१५ ते २१ दिवस पावसाचा खंड पडला तरी पिक विमा मिळणार नाही. कापणीच्या वेळेस जे नुकसान होते ते ट्रिगर उडविण्यात आले आहे. हा बदल केल्यामुळे शेतकरी वर्ग नाराज आहे त्यामुळे शेतकरी वर्गाने या पिक विमा योजनेत उत्साह दर्शविण्यात आलेला नाही केवळ नुकसान आधारित पिक विमा योजना मिळण्याची तरतूद आहे या सर्व अटीमुळे शेतकरी प्रचंड नाराज आहे. शेतकरी वर्गाने विमा घेतल्यास काही नुकसान झाल्यास शेतकरी मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होऊन भवितव्य धोक्यात येणार आहे यासाठी या पूर्वीची एक रुपया पीक योजना चालू ठेवावी ▶▶ पान २ वर...



## मोहम्मद रफींच्या सदाबहार गीतांनी रसिक श्रोते मंत्रमुग्ध

### बीडसह जालना जिल्ह्यातून आलेल्या रसिकांनी दालन ओसंडून वाहिले

बीड । प्रतिनिधी

चित्रपटसृष्टीतील सुरांचे बादशहा–तानसेन म्हणून जगभरात ज्यांचे नाव मोठ्या आदराने घेतले जाते, ज्यांच्या गायन कले समोर रसिक श्रोते नतमस्तक होतात, असे दिवंगत पार्श्वगायक मोहम्मद रफी यांच्या ४५ व्या पुण्यतिथी निमित्ताने पीस बुक डेपो कडून संचालक तथा गायक एम.एम.शेख यांनी दरवर्षीप्रमाणे यावेळीही घेतलेल्या एक शाम मोहम्मद रफी साहब के नाम या कार्यक्रमात संगीतप्रेमींचा महापूर लोटला. मंत्रमुग्ध झालेल्या रसिक श्रोत्यांनी दालन अक्षरशः ओसंडून वाहिले.

बीड शहरात गायक एम.एम.शेख यांनी जिल्हाभरातील इतर गायक–गायिकांना सोबत घेत गायकांचा एक संच तयार केला आहे. हे सर्वजण मिळून अजरामर पार्श्वगायक मोहम्मद रफी यांच्या पुण्यतिथी निमित्ताने दरवर्षी ३१ जुलै रोजी एक शाम मोहम्मद रफी साहब के नाम हा कार्यक्रम विनामूल्य आयोजित करतात. या कार्यक्रमाची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत चालली आहे. यावेळी तर जालना रोड वरील संग्राम हॉटेल च्या दालनात घेण्यात आलेल्या कार्यक्रमास फक्त बीड शहरच नाही तर जिल्हाभरातून तसेच शेजारील जालना जिल्ह्यातून सुद्धा रसिक श्रोते खास कार्यक्रमासाठी आले होते. दालन अपूरे पडल्याने अनेक रसिक श्रोत्यांना माघारी जावे लागले. एवढी प्रचंड आत्मीयता रफी साहेबांच्या गाण्यांप्रती आजही रसिक श्रोत्यांमध्ये आहे. याचा पुन्हा एकदा प्रत्यय आला. कार्यक्रमात एम.एम.शेख यांच्यासह ज्येष्ठ संगीत विशारद–गायक शेख मझहरुद्दीन, आकाश जाधव, संध्या जाधव, प्रियंका भंडारी, सय्यद मुजीब, निशा उजगरे, शेख सैलानी, ड. वर्षा दळवी, अश्विनी दळवी, ज्येष्ठ गायिका शकुंतला ससाने, शकुंतला खरात, सुप्रसिद्ध दंतचिकित्सक डॉ. साळवे, शेख ज़हीर आणि मुक्तपत्रकार एस. एम.युसूफ़ ▶▶ पान २ वर...




## सौंदाना येथे असर इंडिया प्रकल्पांतर्गत पेयजल समृद्ध गाव प्रशिक्षण व प्रमाणपत्र वाटप कार्यक्रम उत्साहात संपन्न – गायके

बीड । प्रतिनिधी

दि.३१ जुलै रोजी सौंदाना ता.जि.बीड येथे असर इंडिया प्रकल्प अंतर्गत आणि रिसोर्स ॲन्ड सपोर्ट सेंटर फॉर डेव्हलपमेंट बेलापूर,मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने वीस तासांचे पेयजल समृद्ध गाव प्रशिक्षण कार्यक्रम ३ जून २०२५ ते ७ जून २०२५ या कालावधीत यशस्वीरित्या पार पडला. या प्रशिक्षणात सहभागी झालेल्या प्रशिक्षणार्थींना दि. ३१जुलै २०२५ रोजी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून ग्रामपंचायत कार्यालय सौंदना तालुका जिल्हा बीड येथील सरपंच सौ जनाबाई सूर्यभान गायकवाड, लघु पाटबंधारे विभाग क्रमांक तीन अंतर्गत असणारे कर्मचारी श्री चिंतामण महाराज मोरे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष श्री गायके राजू ,ग्रामरोजगार सेवक श्री बाळासाहेब गायके व तंटामुक्ती अध्यक्ष श्री कहानू गिणाजी गायके हे उपस्थित होते. ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ जनाबाई सूर्यभान गायकवाड व पर्यावरण सखी सौ पार्वती राजू गायके यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणात सुरक्षित व स्वच्छ पेयजलाची गरज, पाण्याचे महत्त्व तसेच आर्थिक स्वावलंबन यावर सविस्तर प्रकाश टाकला आणि प्रशिक्षणार्थ्यांचे कौतुक केले. या प्रशिक्षणादरम्यान सहभागींचे स्वच्छ पेयजल व्यवस्थापन, जलस्रोतांचे संवर्धन व निगा, पाणी तपासणी प्रक्रिया, जलसंधारण ▶▶ पान २ वर...



## साठे जयंती निमित्त शहर पोलीस ठाण्यात रक्तदान शिबिर

### पोलीस अधीक्षक नवनीत कावत अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांनी केले रक्तदान

बीड । प्रतिनिधी

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीच्या अनुषंगाने बीड शहर पोलीस स्टेशन येथे गुरुवार दिनांक ३१ जुलै रोजी रक्तदान शिबिर घेण्यात आले . या शिबिरामध्ये एकूण ३१ रक्तदात्यांनी आपले रक्तदान केले.

या रक्तदान शिबिरात विशेष म्हणजे पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत यांनी आणि अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांनी रक्तदान केले. त्यांच्यासोबत बीड शहर चे पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ आणि इतर अधिकारी आणि अंमलदार यांनी सुद्धा रक्तदान केले.

यावेळी बोलताना नवनीत कॉंवत त्यांनी सांगितले की, थोर पुरुषांच्या जयंती साजरी करत असताना सर्वांनीच लोकाभिमुख उपक्रम राबवणे गरजेचे आहे. आपण बऱ्याचदा थोर पुरुषांचे जयंती उत्सव राबवत असताना आपण सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरेपासून दूर जात आहोत. थोर पुरुषांची शिकवण आपण विसरत चाललो आहोत असे प्रतिपादन त्यांनी केले. तसेच याप्रसंगी त्यांनी सांगितले की, लोकांनी स्वतःहून पोलिसांना समाजात काही चुकीची घडत असलं त्याची माहिती द्यायला पाहिजे जेणेकरून पोलिसांना त्यावर चांगले काम करता येईल. याप्रसंगी सहभागी झालेल्या लोकांचे कौतुक करून त्यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या. सदरील कार्यक्रमात पोलीस स्टेशन बीड शहर च्या ११ अंमलदार यांनी रक्त दान केले तसेच या रक्तदान कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सहभाग नोंदवला.



## डॉक्टर दत्ता नलावडे डिलीट डॉक्टरने सन्मानित




बीड । प्रतिनिधी

पंडित दीनदयाल उपाध्याय हिंदी विद्यापीठ वृंदावन धाम मथुरा उत्तर प्रदेश या विद्यापीठाद्वारे बीड येथील शिक्षण सामाजिक व मुलांच्या क्षेत्रात काम करणारे डॉक्टर दत्तात्रय साहेबराव नलावडे यांना यावर्षी विद्यापीठाच्या वतीने डि .लीट डॉक्टरेट पदवी दिनांक २७ रोजी नवी दिल्ली येथे प्रदान करण्यात आली . श्री . नलावडे सरांनी गेल्या अनेक वर्षापासून बालक व त्यांच्या हक्क शिक्षण सामाजिक क्षेत्रात भरीव काम केलेले आहे तसे त्यांचे काही पुस्तकही प्रसिद्ध आहेत .

गेल्या अनेक वर्षांच्या सामाजिक ,शैक्षणिक व साहित्यिक कामाचा विचार करून विद्यापीठाने त्यांना डि .लीट पदवी देऊन गौरन्वीत करण्यात आले.

कार्यक्रमाचे संयोजक कुलपती डॉक्टर इंदूभूषण मिश्राजी तसेच या कार्यक्रमाचे मुख्य अतिथी पद्मश्री माननीय डॉक्टर अरविंद कुमारजी ,पूर्व कुलपती राणी ▶▶ पान २ वर...

## हाजीपूर येथे आज महंत विठ्ठल महाराज गहिनीनाथगडकर यांचे काल्याचे कीर्तन

आष्टी । प्रतिनिधी

संत वामनभाऊ व संत भगवानबाबा यांच्या कृपाशीर्वादाने, ह.भ.प.महंत विठ्ठल महाराज शास्त्री (गहिनीनाथगड) यांच्या मार्गदर्शनाखाली आष्टी तालुक्यातील हाजीपुर येथे ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताह सोहळा दि.२५ जुलै दि.१ आगस्ट २०२५ या कालावधीत झाला आहे.ह.भ.प. विशाल महाराज लाड यांनी व्यासपीठ चालक म्हणून काम पाहिले.या सप्ताहात काकडा भजन, ज्ञानेश्वरी पारायण, तुकाराम गाथा भजन,संतकथा, हरिपाठ,हरिकीर्तन वा हरिजागर आदी कार्यक्रम झाले आहेत.सप्ताहात ह.भ.प.राजदीप आंधळे महाराज, ह.भ.प.काशीनाथ महाराज,राम महाराज शास्त्री, विनोदाचार्य ह.भ.प. प्रकाश महाराज साठे,ह.भ.प.बापु महाराज कांबळे, ह.भ.प.किशोर ▶▶ पान २ वर...



## अनिलराधे मित्र मंडळाच्या वतीने मोठ्या उत्साहात अण्णाभाउ साठे जन्मोत्सव साजरा



माजलगाव । प्रतिनिधी

शहरामध्ये अनिलराधे मित्र परिवाराच्या वतीने लोकशाहिर अण्णाभाउ साठे सार्वजनिक जन्मोत्सव दि.३० जुलै २०२५ रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात शाहीर शितल साठे, युवराज ढगे, गायक सुमित साळवे आणि संच यांच्या गायनाचा कार्यक्रम झाला.

कार्यक्रमाचे उद्घाटन बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांनी केले. अध्यक्षस्थांनी आधार सेनेचे संस्थापक अध्यक्ष दिपक थोरात हे तर माजी जि.प सदस्या गयाबाई आवाड, सभापती जयदत्त नरवडे,उपसभापती श्रीहरी मोरे, आयोजक अनिलराधे कांबळे, लहुजी विद्रोही सेनेचे भास्कर शिंदे, युवा नेतेअमोल शेरकर,मानवी हक्क अभियानचे जिल्हाध्यक्ष राजेश क्षिरसागर,प्रहार संघटनेचे तालुकाध्यक्ष हरीष जाधव,सरपंच नारायण भले, सरपंच अजय शिंदे, सरपंच राज अर्जुन, सरपंच रूद्रा कुरे, सरपंच आसाराम शिरसागर,एकनाथ मस्के,सचिन जावळे, ▶▶ पान २ वर...